## - प्रकरण तिसरे -

## // पाळत मधील आशय व अभिव्यक्तीची वैशिष्टये //

द. ता. भोसले यांच्या 'पाळत' व 'पाऊस' या कथासंग्रहांचा सविस्तर अभ्यास करण्याचे योजिले आहे. कालानुक्रमाने प्रथम 'पाळत'चे विवेचन कथानक, व्यक्तिचित्रे, मनोविश्लेषण, विनोदाचे कलात्मक उपयोजन, ग्रामजीवनाचे दर्शन, शीर्षक विचार, संवाद, अलंकार वैभव, दैश, काळ, संदर्भ, कथेचा प्रारंभ शेवट, विविध निवेदन पद्धतीचे उपयोजन, भाषाशैली, जीवन-विषयक दृष्टिकोन या मुद्दयांच्या आधारे करावयाचे आहे.

साठोत्तरी ग्रामीण मराठी कथेला द. ता. भोसले यांनी कोणते योगदान दिलेले आहे याचा शोध प्रस्तुत प्रबंधाकडून घेण्याचे ठरवले आहे.

'पाळत' या विनोदी कथासंग्रहात कौटुंबिक भावबंधाचा आविष्कार, शहाणपणाचे दर्शन व मोठेपणाच्या हौसेचे चित्रण ही आशयसूत्रे येतात. या तीन आशयसूत्रात या कथासंग्रहातील बारा कथा विभाग-लेल्या आहेत.

कौटुंबिक भावबंधाचा आविष्कार या आशयसूत्रात 'पाळत,' 'बाबा गोष्ट सांगा,' 'हट्ट,' 'एका दाताची कहाणी' व 'रजा' या कथांचा समावेश होतो. तर शहाणपणाचे दर्शन या आशयसूत्रात 'करामत,' 'अग अग म्हशी,' 'वसुली' व 'सोबत' या कथा येतात. मोठेपणाच्या हौसेचे चित्रण या आशयसूत्रात 'मी भाषणाला जातो,' 'लाल त्रिकोण' व 'सोबत' या कथांचा अंतर्भाव होतो.

'पाळत' या कथेत पितापुत्राचे एक वेगळे नाते लेखकाने दाखवलेले आहे. भिका व त्याचे वडील तात्या या दोघांमधील भावबंध येथे उलगडले जातात. गुरुजी मायेने भिकाकडे घरी स्वयंपाक कोण करते, या संदर्भात चौकशी करतात व कधी वडील करतात तर कधी कासाराची मावशी स्वयंपाक करते असे उत्तर भिका देतो. ती तुझी मावशी नसून आई आहे असे गुरुजी म्हणतात. आणि भिकाच्या मनापुढे एक वेगळेच चित्र उभे राहते. तात्याची पाठ सोडू नको असा सल्ला गुरुजी देतात आणि भिकचा वडिलांवर पाळतच ठेवतो.

शाळेतून घरी आल्यावर वडील त्याला जेवून घेण्याविषयी सांगतात; पण आपणाबरोबर वडिलांनाही जेवले पाहिजे असे भिका म्हणतो. शेवटी वडिलांना एकत्र जेवावे लागते. मुलाच्या हट्टापायी आपण आमंत्रण असताना जेवायला गेलो नाही तेव्हा त्यांना आता निरोप दिला पाहिजे म्हणून तात्या बाहेर पडतात. पण भिका त्यांची पाठ सोडत नाही. त्याने अभ्यास करावा असा सल्ला तात्या देतात. तोही सल्ला भिका धुडकावून लावतो. तात्यांना दूरवर शिरपा नावाचा मुलगा दिसतो. त्या मुलाबरोबर लपाछपी, विटीदांडू, लंगडी असा खेळ भिकाने खेळावा; पण भिका त्याही म्हणण्याला दाद देत नाही. उन्हामध्ये भिकाचे पाय भाजत होते. भिकाने घरी थांबावे. आपण थोड्या वेळात परत येत आहोत असे तात्या म्हणाले. पण भिकाची घरी थांबण्याची तयारी नव्हती. मावशीकडे जाऊन आपण विश्रांती घेऊ असे भिका म्हणाला. तात्याने भिकाला मारण्यासाठी हात उगारला तसा भिका पळून गेला. ही संधी साधून भिकाला चुकवून तात्या निघाले असताना भिकाने मधल्या बोळातून भिंतीवर उडी मारली आणि तो तात्यांपुढे दत्त म्हणून उभा राहिला आणि हसू लागला. काम करावे याचा निर्णय तात्यांना घेता येत नव्हता. सरळ ते महादेवाच्या देवळात गेले. गुरवाकडून वीणा घेतला. तो आपल्या गळ्यात अडकवला आणि एक तासभर त्यांनी "जयराम- जयराम" म्हणत भजन केले; पण भिका काही प्रसन्न झाला नाही. उलट तात्यांची छाती व पाय मात्र दुखू लागले. खाण्यासाठी पैसे दिल्यास भिका जाईल का, यावर भिकाने होकार दिला. त्याने वडिलांकडून चाळीस पैसे घेतले; पण जाताना आपण खायला घेऊन येत आहोत. तात्याने इथेच थांबावे असे तो म्हणाला. तात्या खूप चिडले. भिकाने घरी जावे. वेड्यासारखे वागू नये असे त्यांनी समजावले. आपण झक मारायला निघालो आहोत. मसणात निघालो आहोत अशी त्यांनी उत्तरे दिली. त्यांना वाटले की या उत्तराने तरी भिका वरमेल. घरी जाईल; पण भिकाने त्यांनी उच्चारलेल्या वरच्या ठिकाणी येण्याचे आनंदाने मान्य केले. त्यामुळे ते चिडले आणि हातात दगड घेऊन भिकाच्या पाठीमागे निघाले. धोतर वर धरून पळणाऱ्या तात्यांना अचानकपणे ठेच लागली. रस्त्यात ते

आडवे झाले. गुडघ्या, तळवा, नाक यांना इजा झाली. हे दृश्य पाहून भिका हसू लागला व तात्या पुरते खाजील झाले. भिकाने आपल्याबरोबर येण्यास आता तात्यांनी होकार दिला. ते दोघे हॉटेलात आले. भजी, शेव, पापडी, ग-याचा लाडू, मिसळ या पदार्थांवर बापलेकांनी ताव मारला. मग त्यांनी त्यांच्याकडे जेवायला जावयाचे होते त्यांच्याकडे न जाण्याचे ठरविले आणि दोघेही घरी आले. दोघेही झोपले. थोड्या वेळात घोरू लागले. भिका चांगलाच घोरू लागला आहे हे पाहिल्यावर तात्यांनी हळूच घराचा निरोप घेतला आणि ते कासारणीच्या घरी गेले.

आपण उशिरा का आलो याचे कारण म्हणजे भिका. असे स्पष्टीकरण त्यांनी दिले. तात्या आणि कासारीणबाई यांचे प्रेम रंगात, आले तेवढ्यात भिका कासारीण मावशीच्या दारात आला व त्याने तात्याला हाक मारली. आपल्या वडिलांना कासारीण मावशीबरोबर तशा प्रसंगात पाहिल्यावर भिका गडबडून गेला नाही, तर त्याने उंब-यातच बसकण ठोकली आणि, 'चालू द्या तुमचं ! मी काय न्हाय करत' एवढेच तो बोलला. गुरुजींच्या सांगण्याप्रमाणे भिकाने पाळत ठेवून आपल्या वडिलांना बरोबर पकडल्याचे दिसते.

'बाबा गोष्ट सांगा' ही एक कौटुंबिक कथा आहे. सामान्य माणसाची दैनंदिन जीवन जगताना केवढी ओढाताण होते. याची जाणीव कथा वाचताना होते. रात्रीच्या वेळी जेवण झाल्यावर नायक, कॉटवर सुपारी चघळत विश्रांती घेत होते. आजूबाजूला छानसे चांदणे पडलेले होते. नायक भलत्याच खुशीत होते. पण त्यांचा हा आनंद त्यांच्या मुलांनी टिकू दिला नाही. बंड्या व बबडी ही दोन्ही मुले घरातून धावत बाहेर आली व त्यांनी नायकाला म्हणजे त्यांच्या बाबांना जणू ताब्यात घेतले. 'बाबा गोष्ट सांगा' हे वाक्य निरनिराळ्या शब्दांचा उपयोग करून ते सांगत होते. आणि त्यांनी बाबांचे पोटच बडवायला सुरूवात केली. बाबा डोळे मिटून शांत पडले होते. आपले वडील बहुधा गोष्ट आठवत असतील असे त्या मुलींना वाटले. थोड्या वेळाने बाबांनी घोरण्यास सुरूवात केली व आता तरी आपण मुलांच्या तावडीतून सुटू असे त्यांना वाटले.

बाबांना काही हे समाधान मिळाले नाही. दोघांनी बाबांच्या मिशीची टोके ओढायला सुरुवात केली. शेवटी बाबा मुलांपुढे हतबल झाले. त्यांच्या आईने त्यांना असे वागायला शिकवले होते.

आपण गोष्टीची जुळवाजुळव करीत आहोत, एक तासाने आपण गोष्ट सांगू, तोपर्यंत आईचीही आवरून होईल असे बाबांनी सांगितले. पण बाबांचा अंदाज फसला. मुलांना कल्पना होती की, वडील असे म्हणतात आणि आपण झोपी जातो. बंड्याने बबडीला आपण झोपायचे नाही व बाबांनाही झोपू द्यायचे नाही असे सांगितले. बंड्याचा मुद्दा बबडीने उचलून धरला. बाबा खोटे बोलतात. आपणाला झोप लागली असे म्हणणारे बाबा आईशी बराच वेळ गप्पा मारीत बसतात असे बबडीने सांगितले व बबडीने एकदा त्या दोघांना झोपण्यासाठी निक्षून सांगितले होते.

बाबांच्या लक्षात आले की, गोष्ट सांगण्याशिवाय आपल्याकडे पर्याय नाही तेव्हा त्यांनी कोणती गोष्ट सांगायची असे मुलांनाच विचारले. मुलांना काही खास आकर्षण नव्हते. त्यांना कोणतीही गोष्ट चालणार होती. बाबांनी वाघाची गोष्ट सांगण्याचे ठरवले. त्यावर बाबांनी आपणास वाघाची गोष्ट सांगू नये कारण ती गोष्ट सांगताना बाबा भीतीने ओलेचिंब होतात, अशी मल्लीनाथी बंड्याने केली. मग आपले बाबा भित्रे कसे यावर त्या भावंडांनी चर्चा केली. बाबा खूप चिडले होते. बंड्याला मारण्यासाठी त्यांनी हातही उगारला होतात; पण बंड्या आपल्या विचाराशी ठाम होता. एक वेळ बाबा घाबरतील पण आपण मात्र घाबरत नाही असे त्याने ठणकावून सांगितले. बाबांची मुलांपुढे पुरती शोभा झाली; पण त्यांनी आपण

मात्र घाबरत नाही असे त्याने ठणकावून सांगितले. बाबांची मुलांपुढे पुरती शोभा झाली; पण त्यांनी आपण कोणाला घाबरत नाही असे निक्षून सांगितले पण बंडूला वडिलांच्या प्रपंचातील अनेक गोष्टी माहीत होत्या. क्रमवश धुताना बाबांकडून एक बशी फुटल्यावर बंड्याची आई बाबांना खूप बोलली होती. आपण चुकलो म्हणून बाबांनी कानही धरले होते.

बाबा असे वागतात त्याला कारण ऑफिसातील रेगेबाई असे मुलांना वाटते. मुलांनी बाबांना कोंडीत पकडले होते. शेवटी बाबांनी गोष्ट न सांगण्याचे जाहीर केले. तशी मुले नाचत धावत आईकडे गेली व जोरजोराने रडू लागली. मुलांनी वडिलांविषयी आईकडे तक्रार केली ती माऊली तरातरा धावत बाहेर बाबांकडे आली. आणि आपला नवरा आपल्याला अक्कल नाही वगैरे म्हणतो यावर तिने प्रश्नांची सरबत्ती केली व रडण्याचे शेवटचे अस्त्रही काढले. बाबांनी आपली भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला पण तिने काही ऐकून घेतले नाही. ऑफिसमधल्या एखाद्या बाईने काम सांगितले की, त्यांच्यापुढे आपला नवरा धावणार तेव्हा तिने मुकाट्याने गोष्ट सांगा असा दमच भरला.

मुले रडत रडतच अपराधी मनाने बाबांजवळ बसली. आपले बाबा भित्रे आहेत हे त्यांना पटले होते. तशात त्यांनी वेगवेगळे प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. आपले वडील गोष्ट सांगतात का नाही या गोंधळात मुले होती. बंड्याने लाडात येऊन सांगितले की, बाबांनी एक गोष्ट सांगितल्यावर तो एक गोष्ट सांगणार होता. शेवटी बाबांनी बबडीला गोष्ट सांगण्यास सांगितले. तिने दोन ओळीत गोष्ट पूर्ण केली. मग बाबांनी बंड्याला गोष्ट सांगण्याविषयी विचारले त्याने मोठी गोष्ट सांगावी अशी अपेक्षाही

व्यक्त केली. बंड्याने नेहमीचीच गोष्ट सांगताना एक चिमणी आली दाणा घेऊन गेली. अशा रीतीने कितीही लांबवता येईल अशी गोष्ट सांगण्यास प्रारंभ केला.

बाबांनी अडथळा आणल्यावर आईला बोलवण्याचे त्याने ठरविले. मग शेवटी न राहवून बाबांनी गोष्ट सांगण्यास सुरुवात केली. ती रामायणाची गोष्ट होती. दशरथ, त्याच्या तीन बायका अशी सगळी कथा होती. मग गोष्ट सांगता सांगता मुले प्रश्न विचारीत होती. मुलांच्या शंका चित्रविचित्र होत्या. गोष्ट काही बाबांना नीट पुरी करता येईना. त्या गोष्टीचे प्रत्येकजण वेगवेगळे अर्थ काढीत होता. शेवटी मुले कंटाळली. त्या दोघांनीही बाबांच्या गळ्यात हात घातले होते. मुले झोपली. एकेकाला आत नेले पाहिजे असे बाबा पत्नीला म्हणाले; पण ती मुले झोपेतच गोष्टीतले प्रसंग बडबडत होती. पुटपुटत होती.

'हट्ट' या कथेचा प्रारंभ राणूच्या घरातील आरडाओरडीने होतो. पहाटे चारची वेळ. काही घरातून हालचाली सुरू झाल्या होत्या आणि एकाएकी राणूच्या घरातून रडण्याचे आवाज येऊ लागले. राणूची पत्नी तारामती आपल्या नवऱ्याच्या मृत्यूचे विलक्षण दुःख व्यक्त करीत होती. ते दृश्य पाहून राणूचा मुलगा सदाही रडू लागला. दोन दिवस उलट्या, जुलाब झाल्याचे निमित्त होऊन राणू धारणीवर पडला होता. काही जुजबी गावठी उपाय झाले होते; पण राणू काही त्या आजारातून उठला नाही.

राणू गेल्याची बातमी सगळ्या गावभर झाली आणि माणसे राणूच्या घरी आली आणि दुःख व्यक्त करून बाहेर ओट्यावर बसत

होती. सदाकडे पाहणाऱ्या प्रत्येकाला दुःख होत होते. या मुलाचे पुढे कसे व्हायचे अशी काळजी प्रत्येकजण प्रकट करीत होता.

त्यात आठ वाजत आले. सगळ्या गावातील मुलेही राणूच्या घराकडे आली. रडारड, गंभीरपणे बोलणे यामुळे साऱ्या वातावरणावर एक उदास व खिन्न अशी छाया पसरली होती. माणसे गटागटाने बसून बोलत होती. तेवढ्यात गावातील चार कर्ती म्हातारी माणसे घेऊन हरिभाऊ पाटील आले. सगळेजण सावरून बसले व पाटलांनी पुढच्या तयारीला लागले पाहिजे अशी घोषणा केली. पण तेवढ्यात जवळच्याच बटान नावाच्या गावात राणूची मुलगी दिलेली आहे तिला बोलावले पाहिजे असे दगडू म्हणाला. ते काम मुरग्याला सांगण्यात आले. ते गाव दोन अडीच कोस लांब होते व मुरग्या त्या गावाला नर्मदेला आणायला गेला. त्यानंतर लोक राणूचा आजार, औषध यांची चिकित्सा करू लागले. त्याच्या प्रामाणिकपणाच्या गोष्टी रंगू लागल्या. मग लोक स्मशानातील अनुभव सांगू लागले. घरातील रडणेही कमी झाले व आठवणींवर अधिक भर दिला गेला. हे सगळे सदा ऐकत होता.

वेळ जात होता, दुपारचे अकरा वाजले. राणूला स्मशानात अग्नी दिल्याशिवाय गावामध्ये कामधंदा, चहापाणी काहीच होणार नव्हते. मग लोक मुरग्याची वाट पाहत होते. त्याला का उशीर लागला असेल, या विषयी तर्क सुरू झाले. नर्मदा रानात गेली असेल किंवा मुरग्या झाडा-खाली झोपला तर नसेल अशा शंका लोकांच्या बोलण्यातून डोकावत होत्या. पण ही वेळ लक्षात घेता मुरग्या असे करणार नाही असे लोक म्हणू लागले. पाटील डोळे मिटून विचार करू लागले. नदीपर्यंत जाऊन

मुरग्या दिसतोय का, हे पाहण्यास त्यांनी एकाला पाठवले तर दुस-या बाजूला त्यांनी इतर व्यवस्था करण्यास प्रारंभ केला. लाकडे, गोव-या, रॉकेलचा डबा, किरकोळ सामान सगळे त्यांनी जमविले. जो माणूस नदीवर गेला होता त्याने चिंचोलीच्या रानात चार-पाच माणसे दिसतात अशी बातमी आणली. १५ मिनीटांनी नदीवर गेलेला एक मुलगा धावत आला व मुरग्या महाराबरोबर चार पाच माणसे येत आहेत अशी बातमी त्याने आणली. अर्ध्या तासाने तिची सासू, सासरा, नवरा आले. बरोबर मुरग्याही होता. सगळीकडे रडारड सुरू झाली. नर्मदेच्या नव-याने सदाला मांडीवर घेतले आणि तो डोळे पुसू लागला. नंतर नर्मदाही सदाला मिठी मारून आक्रोश करु लागली. हा आक्रोश काही लवकर थांबणार नाही याची पाटलांना कल्पना आली व मग त्यांनी सगळ्यांना उद्देशून रडण्याने माणूस परत येत नाही. आपण प्रत्येकजण आज ना उद्या मरणार आहोत. डोळे पुसून पुढच्या तयारीला लागले पाहिजे असे सांगितले. पाटलांच्या या म्हणण्याचा परिणाम झाला. मग म्हाता-या बायकांनी पुढाकार घेतला. प्रेताला स्नान घातले आणि प्रेत तिरडीवर ठेवून सदाच्या हातात मडके दिले. सगळेजण स्मशानात आले. पाटलांनी व इतरांनी लाकडे रचली. आणि प्रेताला अग्नी दिला. त्यावेळी ऊन वाढले होते. सावलीसाठी एकही झाड नव्हते. सदाने चितेला नमस्कार केला. सर्वांनी नदीत आंघोळी केल्या. परत सगळेजण राणूच्या घरी आले. तारामतीला सर्वांनी दिलासा दिला. काहीजण थोडावेळ थांबले. नंतर एकेकजण घरी गेला.

एका मुलीने सदाचे कपडे शोधले. त्याने कपडे बदलले व चिंताक्रांत बसलेल्या बायकात जाऊन तो बसला. परत तारामतीने आपल्या मुलाचे काय हे नशीब असे म्हणून रडण्यास सुरवात केली. संध्याकाळची चार-साडेचारची

वेळ झाली. रानामध्ये गेलेल्या बायका तारामतीला भेटायला आल्या. तारामती त्या बायकांना राणूचे कष्ट, त्याग, प्रेम, सचोटीपणा सांगू लागली. सगळेजण शांत असताना अचानक एकाएकी सदा रडू लागला. नर्मदेची सासू त्याला शांत करू लागली. नर्मदा, तारामती, ताराबाई सगळेजण त्याला शांत करीत होते. पण त्याचे रडणे थांबेना. वेगवेगळे प्रश्न विचारून ताराबाई त्याच्या मनात काय आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न करत होती. रडत रडत सदा म्हणाला की सकाळपासून आपण उपाशी आहोत व आपणाला भाकरी हवी. असे म्हणून तो अधिकच रडू लागला.

'एका दाताची कहाणी' कथेत टिल्याच्या दिवाळसणाची व त्यामुळे त्याच्या दाताची होणारी कहाणी आहे. टिल्याचा पहिला दिवाळसण होता. मोठ्या उत्सुकतेने, सासरवाडीचा पाहुणचार व जमेल तेवढे लुटण्यासाठी तो मोठ्या हौसेने सासरवाडीला गेला होता. पहिला दिवाळसण म्हणून टिल्याच्या सासूने मन लावून सर्व पदार्थ केले होते. टिल्याच्या बायकोनेही आईच्या कामाला मदत केली होती. लाडूपासून वड्यापर्यंत अनेक पदार्थ तयार केले होते.

टिल्या घरी आल्यावर सर्वांनी त्याचे मोठ्या पण खोट्या उत्साहाने स्वागत केले. सासरेबुवांच्या मनात आले की त्याने माझी पोरगी मिळाली आणि आता मला व माझे गिळायला आला आहे. पण हे सगळे पोटातच ठेवले होते. मोठ्या प्रसन्न चेहऱ्याने फराळाचे ताट टिल्यासमोर ठेवले आणि आपला जावई या पदार्थांची स्तुती कशी करतो आहे ते ऐकण्यासाठी त्या अत्यंत आतुर झाल्या.

टिल्याने प्रथम समोरच्या ताटातले अनारसे उचलले; पण ते फोडताना त्याच्या टाळूला असह्य वेदना झाल्या आणि तो नाद सोडून दिला. त्या अनारशाला त्याने फक्त जीभ लावली. पण त्यामुळे जीभेची तृप्ती झाली नाही मग त्याने करंजी हातात घेतली. ती एका अंगाने कच्ची होती. बोट दाबून तिच्या आतला भाग खावा म्हटले तरी अपयश आले. चकली देखील तशीच होती. ती दोन्ही हातात धरून होता नव्हता तो जोर त्याने लावला तरी ती काही तुटेना. आपला हात दुखावेल म्हणून त्याने तो नाद सोडला. निदान लाडू तरी खावा असे त्याला वाटले तो फोडायचा त्याने प्रयत्न केला. टिल्याच्या हालचालीकडे सासूबाई कौतुकाने पाहत होत्या. त्यांना वाटले की, आपले जावई चविष्ट दिसतात. टिल्याने लाडू खावयाचा असा निश्चय केला. अनेक पध्दतीने लाडू खाण्याचा प्रयत्न केला पण लाडू भलताच कडक होता. त्याने फरशीवर तो पाच सहा वेळा आपटला पण केवळ खणखण असाच आवाज आला. शेवटी त्याने दोन्ही हातांची खोबणी केली आणि लाडू हातात धरून फोडायला सुरवात केली. लाडूवर खरे तर दातांची पांढरी रेषा प्रथम उमटली होती त्याला वाटले आपण जरा जोर केला तर लाडू फुटेल. त्याने लाडू फोडण्याचा प्रयत्न केला तर त्याचा हातच मुळापासून हलला. अग आई ग. असे म्हणून तो ओरडला व हातातला लाडू रागाने क्रिकेटच्या चेंडूप्रमाणे त्याने समोर फेकला तो नेमका सासूबाईच्या पायावर आदळला व बघाता बघाता त्यांचा पाय सुजून टम्म झाला. टिल्याचा गालही सुजला होता. त्याच्या डोळ्यात पाणी आले. सासूबाईही दीड पायावर चालू लागल्या. हे सगळे दृश्य पाहणारी मुले मात्र मनापासून हसत होती. याचा परिणाम म्हणजे टिल्याचा दात व हिरड्या सुजल्या होत्या. शेवटी सासरेबुवांनी धावाधाव

केली. त्याला डॉक्टरकडे नेले. घरातल्या बच्चे कंपनीला टिल्याचा सुजलेला गाल पाहून रामभक्त हनुमानाच्या गालाची आठवण झाली. सासरेबुवांनी डॉक्टरांसमोर आपल्या पत्नीची खूप निंदा केली.

डॉक्टरांनी टिल्याची पूर्ण तपासणी केली. सूज कमी झाल्याशिवाय आपणाला काही करता येणार नाही असा निर्वाळा त्यांनी दिला. डॉक्टरांनी पथ्यपाणी सांगितले. टिल्याला फक्त कोमट दूध देण्यास सांगितले. आणि सूज कमी होण्यासाठी गोळ्या दिल्या. दुसऱ्या दिवसापासून टिल्याचा वेगळाच पाहुणचार सुरू झाला. त्याच्या समोर त्याची मेहुणे मंडळी दिवाळीच्या पदार्थांवर यथेच्छ ताव मारत होती. व ज्या दुधाचा टिल्याला कंटाळा होता ते दूध त्याला प्यावे लागत होते. तीन चार दिवसांनी टिल्याचा गाल जरा कमी झाला; पण त्याला दुसऱ्याच संकटाला तोंड द्यावे लागले. काहीच हालचाल न करता त्याला सतत दूध प्यावे लागत होते. त्यामुळे ते दूध पचले नाही व जुलाब सुरू झाले. त्यामुळे त्याला कमालीचा धक्का आला. परत मंडळी डॉक्टरांकडे गेली. डॉक्टरांनी प्रेमळपणे विचारपूस केली. जुलाबावर उपाय म्हणून औषध दिले. हे औषध घेतल्यावर त्याची धावपळ मंदावली. चौथ्या दिवसापासून त्या नैसर्गिक कार्यासाठी तो धावलाही नाही.

पण चार दिवस पोट साफ न झाल्यामुळे त्याला वेगळाच त्रास सुरू झाला. ढेकरा देणे, गॅस होणे, जळजळणे या तक्रारी सुरू झाल्या. शेवटी एकदाचे सासरे जावई डॉक्टरांकडे गेले. त्यांनी औषध बदलून दिले. तीन चार दिवसांनी त्याला बरे वाटू लागले. सगळे काही ठाकठीक झाल्यावर सासूसासऱ्यांनी हलणाऱ्या दाताची आठवण करून दिली. तो हलणारा दात काढून घ्यावा असा सल्ला दिला. शेवटी एकदाची ही स्वारी

डॉक्टरांकडे गेली. आणि डॉक्टरांनी टिल्याचा दात काढण्याचा खूप प्रयत्न केला ते घामाघूम झाले पण दात काही निघेना. काही दिवस थांबण्यास डॉक्टरांनी सांगितले. खरे तर टिल्याच्या जबड्याची बारीक बारीक हाडे ठणकू लागली होती. त्याला बोलताही येत नव्हते. घरी आल्यावर त्याने चहा मागितला. जावयाला नुसता चहा कसा द्यावयाचा म्हणून सासूबाईंनी फराळाचे ताटही आणले. टिल्याला खूप दिवसाची उपासमार झाली होती. म्हणून टिल्याने ताटातला लाडू उचलला. तो वैतागला होता त्याचे कारण म्हणजे डॉक्टरांनी हलणाऱ्या दाताला धक्काही लावला नव्हता. पण त्याचा चांगला दात मात्र हलवला होता. त्याने डॉक्टरांना बोल लावला आणि लाडू तोंडात घातला तो फोडण्यासाठी दात ओठ खाऊन त्याने ताकद लावली तर त्याचा तो हलणारा सुप्रसिध्द दात त्याच्या पुढ्यात पडला. आणि मागून रक्ताची धार त्या न फुटलेल्या लाडूवर सांडू लागली.

जीवनात नाट्य सर्वदूर भरून राहिलेले असते. माणूस ठरवितो एक आणि घडते दुसरेच. असे अनेकदा घडते. 'रजा' या कथेतील राजाराम हा मिलीटरीतला शिपाई. त्याने खूप खटपट करून आठ दिवसांची रजा मिळविली होती. साताऱ्याच्या स्टॅन्डवर तो उतरला. खानपैकी त्याने आळस दिला व आपल्याजवळचे सगळे सामान हमालाच्या डोक्यावर दिले. खिशातून चारमिनारचे पाकीट बाहेर काढले व सिगरेट पेटविली. त्याला खिंडवाडीला जायचे होते. हे गाव साताऱ्यापासून चार मैल दूर होते. हमालाने सामान टांग्यात ठेवले. टांगा खिंडवाडीकडे जाऊ लागला. आईला, खास करून बायकोला भेटण्यासाठी तो उत्सुक होता. जवळजवळ सध्या

वर्षाने तो घरी चालला होता. काश्मीर फ्रंटवर वारंवार कटकटी होत होत्या. आणि त्याला रजा मिळत नव्हती. शेवटी आई सिरीयस आहे अशी बतावणी त्याने केली व आठ दिवसांची रजा काढून तो गावी आला. त्याने मनाशी काही एक हिशोब केला होता. त्याला जाण्यासाठी व येण्यासाठी चार पाच दिवस लागणार होते. तरीपण दोन तीन दिवस आपले आहेत. आपल्या चैनीचे आहेत. रात्रभर बायकोशी गप्पा मारता येतील असा त्याचा हिशोब होता.

टांगा हळूहळू चालला होता. त्याने टांगेवाल्याला जोरात टांगा हाकण्यास सांगितले. टांगेवाल्याला सिगारेट दिली. लग्न झाले व त्याला फ्रंटवर जावे लागले. आपल्या वाटेकडे आपली पत्नी डोळे लावून बसली असेल असे त्याला वाटले. तिच्यासाठी पातळ,पर्स,खाऊचे पुडे हे सगळे त्याने आणले होते. आपण तीन दिवस बायकोच्या सहवासात मजेने राहायचे असे त्याने ठरविले होते.

तो गावाजवळ आला. आईला भेटला. बरोबर दोन,तीन बायका होत्या. पण गावाच्या चालीरीतीप्रमाणे बायको आली नव्हती. घरी गेल्यावर त्याने हातपाय धुतले. कपडे बदलले. आईने सुनेला चहा ठेवण्यास सांगितला. तिनेच चहा आणावा असे त्याला वाटले. पण ती आली नाही. मग त्याने गावातील लोकांची चौकशी केली. आलेल्या बायकांनी अनेक प्रश्न विचारले. तो कंटाळला होता. पण राजाराम आला हे कळल्यावर मुलांची गर्दी झाली. जो तो त्याच्याशी बोलू लागला. जरा पाणी पिवून येतो असा उठण्याचा त्याने बहाणा केला; पण म्हातारीनेच पाणी आणून दिले. गप्पा काही संपत नव्हत्या. 'रात्र बरीच झाली वाटतं.'

असं त्याने पुटपुटल्यावर बायका उठल्या व घरी गेल्यावर बापई मंडळींना त्यांनी पाठवले. मग गप्पा वाढत गेल्या. त्याच्या जेवणाचाही कुणी विचार केला नाही. राजाराम कंटाळून गेला.

रखमादेखील वाट पाहून पाहून थकून झोपी गेली होती.पण वरच्या छपरातून एक उंदीर तिच्या अंगावर पडला आणि तिने किंकाळी मारली. मग उंदीर मारण्यात काही काळ गेला. शेवटी एकदाची गप्पांची बैठक संपली. मग राजारामच्या मित्रांनी घरात उंदीर झाल्याची खात्री करुन घेतली. राजारामने देवळात झोपायला यावे असे सगळ्यांनी सांगितले. म्हातारीनेही याला संमती दिली. राजारामचा चेहरा पाहण्यासारखा झाला. आजचा दिवस घरी झोपून पाहतो असे तो म्हणाला, पण मित्रांनी त्याला देवळात नेलेच. सगळे झोपले होते व तो एकटाच तळमळत होता. सकाळी तो लवकर उठला. घरी गेला; पण त्याचे मित्र त्याला चहाला बोलवायला आले. बायकोची चौकशी केली. ती रानात गेली होती. म्हातारीने अंड्याचा रस्सा व अंड्याच्याच पोळ्या केल्या होत्या. राजारामने भरपूर ताव मारला. आईनेही आग्रहाने वाढले. त्याला कमालीची सूरसूरी चढली. तो जो झोपला तो पाचच्या सुमारास जागा झाला.

त्याने पाहिले तर त्याचे सासरे व मेहुणे आले होते.या पाहुण्यांबरोबर गावातील माणसेही येत होती. पीक,पाणी,कोर्टकचे-या,राजकारण यावर चर्चा चालल्या होत्या. नंतर मंडळी उठली. सास-याबरोबर राजारामचे जेवण झाले. म्हातारीने पाहुणे व रामराव यांचे अंथरुण पुढच्या खोलीत घातले. राजारामला तिने आतल्या खोलीत ढकलले.

दाराजवळच एका गोणपाटावर म्हातारी कलंडली. तो रखमाशी प्रेमाच्या गोष्टी बोलू लागला. तिचे तो चुंबन घेणार तेवढ्यात रामरावाने भोकाड पसरले. आणि तो मुलगा रडू लागला. बाहेर रखमाचा बाप भालताच पिडला होता. पडि.लांनी आपल्याला घट्ट आवळले असे मुलाने शेवटी सांगितले. ती भावाला सांगत होती. तू सासूबाईजवळ झोप; पण तो ऐकत नव्हता. आपण ताईजवळच झोपणार असा हेका त्याने चालू ठेवला होता. राजारामने मेहुण्याला बिस्कीटाच्या पुड्याचे आमिष दाखवले; पण तो ऐकत नव्हता. तात्या पुन्हा पिडले होते. आपल्या मुलाला मारण्याच्या तयारीत होते. म्हातारीने च्याहयाला शांत केले. शेवटी मेहुणा बायकोजवळ झोपला. व राजा-रामला सास-याजवळ आडवे पडावे लागले. दुस-या दिवशी रामरावने बिस्कीट मागण्यास सुरुवात केली. दिवसाचा वेळ असाततच गेला. मित्रांच्या भेटी, चहा, कॉफी, पान, सिगारेट यातच दिवस गेला. रात्री रखमाची आपली भेट होईल असे त्याला वाटले. पण मेहुण्याने हट्ट धरला त्यालाही आत झोपायचे होते. सगळ्या गोष्टीचा त्याला राग आला. रात्री खूप उशीरा तो खोलीत गेला. रामरावला त्याचा स्पर्श झाला तर भावजीने आपली झोपमोड करू नये असे तो म्हणाला. नंतर उशीरा रामरावला अलगद उचलून बाहेर आणावे असे त्याला वाटले; पण आपण बोंब मारू असे मेहुण्याने ऐकविले. शेवटी त्याला झोपकून तो दोघांच्या पायाजवळ बसला.

रात्री दोन अडीच वाजता शेवटचा एक प्रयत्न करून पाहवा म्हणून त्याने रखमाला हलविले. तिला आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न केला. ती घाबरली. तिने चोर, चोर, धावा धावा असा ओरडा केला. त्यामुळे सगळेजण जागे झाले. राजारामने बसल्याजागीच झोपेचे सोंग

घेतले. रखमाने त्याला उठविले मग चोरांच्या गप्पा सुरू झाल्या. दिवस उगवला; पण या गप्पा संपेनात. शेवटी सकाळी सात वाजल्यावर सगळे उठले व आपापल्या घरी गेले.

दहा वाजले. राजारामने जायची तयारी केली. सगळे सामान भरले. आईला, सासऱ्याला नमस्कार केला. एका पोराच्या डोक्यावर बॅग ठेवून तो परतीला निघाला. सडकेपर्यंत पोहचवायला सगळेजण आले. तो हसत होता; पण मनातून त्याला अतिशय वाईट वाटत होते. त्याने सर्वांना रामराम घातला.

'भावजी, पुन्हा केव्हा येणार तुम्ही ?' असा मेहुण्याने प्रश्न विचारल्यावर, 'मी ? तुझी ताईसंग झोपायची सवय सुटल्यावर! येतो आता.' असे त्याने उत्तर दिले. कुणाला दिसणार नाही अशा बेताने त्याने डोळ्यांतील पाणी पुसले व पुढचे पाऊल टाकले. पृ. १०२

'करामत' या कथेत किष्णाबाई व दामू यांच्यातील भावबंध स्पष्ट करण्यात आले आहेत. खेड्यातील जीवन हे शेतातील कामावर अवलंबून असते. घरे तर खेड्यातील बायका ह्या वेळ, काळ ओळखून वागत असतात; पण कधी कधी वेळेचे भान राहत नाही. दारिद्र्य तर पाचवीला पुजलेले असते. दिवसभर शेतात राबले तरी घरी लगेच परतता येत नाही. कारण काटक्या वेचाव्या लागतात त्यावरच घरी जाऊन स्वयंपाक करावयाचा असतो. या नादात किष्णाबाईला दिवस मावळल्याचे काही लक्षात येत नाही. जेव्हा लक्षात येते तेव्हा ती गावाच्या दिशेने झपाझपा चालू लागते. विधवा असणाऱ्या या नायिकेची सासूच फक्त घरी असते. ती आपली वाट पाहत असणार असे किष्णाला वाटते.

रस्त्याने भरभर चालत असताना तिला आवाज ऐकू येतो. तिने

प्रश्न केल्यावर ती व्यक्ती म्हणजे गावातील नामू तात्याचा दामू आहे असे तिच्या लक्षात येते. मग तिची भीती दूर होते. दोघे मिळून चालू लागतात. गेना आबाच्या मळईला किष्णा खुरपायला गेली होती. त्या संदर्भात तो खोचक प्रश्न विचारतो. पण ती हसत हसत उत्तर देते. खेड्यामधल्या विधवा बाईला अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. जी भानगडीखोर माणसे असतात त्यांना तर अशी बाई म्हणजे आपली मालमत्ताच वाटत असते. खुबीने वागून असा प्रसंग निभावून नेणे किष्णाला आवश्यक होते. बोलता बोलता गावाचे दिवे दिसू लागतात. दामूने मुकाट्याने चालू नये, त्याने बोलावे असे किष्णाबाई म्हणाजे. दामूदेखील ब-याच दिवसापासून आपणाला किष्णाबाईशी बोलायचे आहे असे म्हणत होता; पण तेवढ्यात अंधारात त्या दोघांची धडक होते. त्याच्या मनात वाईट विचार येतात; पण तो विचार करतो या गोष्टी धीराने आणि बाईच्या कलाने घेतल्या पाहिजेत. एवढे शहाणपण त्याच्याकडे होते म्हणून तो तिच्यापुढे आपल्या प्रेमाची फक्त कैफियत मांडतो.

दामूच्या बोलण्याला काय उत्तर द्यावे याचा किष्णा विचार करत होती. तिने हसत हसत उत्तर दिले. दामूच्या बोलण्याला तिने प्रतिसाद दिला. विधवा बाईला कोणाचा तरी आधार असण्याची आवश्यकता तिने मांडली. आणि दामूपेक्षा ऐपतदार माणूस आपल्या पांढरीत दुसरा कोणी नाही असे ती म्हणाली.

किष्णाने आपल्यालाही त्याचे प्रेम मान्य आहे असे सांगितले. त्याने वचनाची भाषा सुरु केल्यावर तिने आपला दामूवर विश्वास असल्याचे सांगितले. ती त्याला कारभारी म्हणते आणि दामू तिला

घरधानीण मानू लागतो. तिने रोजगार सोडावा. नुसता नावाला रोजगार करायचा असेल तर त्याच्या शेतावर यावे. एकमेकांच्या जणू आणा-शपथा झाल्या. गाव जवळ आले होते. वाट फुटण्याची वेळ आली होती. तरी आपण मुद्द्याचे बोललो नाही असे दामूला वाटले. कोठे आपण भेटावयाचे असा प्रश्न दामूने उतावीळपणे केला. बुधवारी संध्याकाळी जेवणवेळ संपल्यावर कोंडीबा पाटलाच्या शेतात विहिरीच्या समोरच्या झुडपाजवळ आपण बसू असे किष्णा म्हणाली. त्याने ही गोष्ट विसरू नये. किष्णा इकडे वाट पाहते आणि दामू दुसरीकडेच रमलेला आहे असे दृश्य दिसू नये. असे घडू नये. अशी अपेक्षाही किष्णाने व्यक्त केली. निरोप घेतल्यावर आपण एका मोठ्या संकटातून वाचलो असे किष्णाला वाटले. तिच्या मनावर फार मोठा ताण आला होता. तो ताण सैल झाला.

घरी गेल्यावर सासूने किती वेळ केलास अशा आशयाचा प्रश्न विचारला तेव्हा किष्णा रडू लागली आणि तिने घडलेली सर्व कर्मकहाणी सांगितली. तिची सासू रागाने लाल झाली. सुनेने रडू नये. त्या दामूकडे आपण पाहणार आहोत असे तिने सांगितले. आज बुधवार आहे हे विसरू नका असा निरोप बुधवारी किष्णाने एका मुलीजवळ दामूला दिला. ती वेळ दुपारची होती. नुकतेच जेवण करून दामू पान खात बसला होता. भेटीची चित्रे त्याच्या डोळ्यांपुढे तरंगू लागली. तिला पाचा-पाचाच्या दोन नोटा द्यावयाच्या, पान खाऊ घालावयाचे असेही त्याने ठरविले.

संध्याकाळ झाल्यावर त्याने बैलांना वैरण घातली. डोक्यावर पटका चापून चोपून बांधला. त्याच्या मनाला तो बांधलेला पटका आला

13316
A

नाही तेव्हा तो विस्कटून त्याने पुन्हा बांधला. किष्णासाठी देखील एक पान तयार केले. आठवणीने हातभट्टीची पावशेर दारु घेतली. त्याचे सुदैव असे की, कोंडीबा पाटलाच्या शेताकडे जाताना त्याला कुणी भेटले नाही. पण तो बामणाच्या ओढ्यापर्यंत आल्यावर गावा-कडे निघालेली दोन पोरं भेटली तेव्हा त्यांच्यापासून बरेच अंतर राखून तो थांबला. ती मुले लांब गेल्यावर अधीरपणे कोंडीबाने पडकी विहीर गाठली. जरा बाजूला येवून त्याने पाहिले तर एका झुडपाजवळ जोंधळ्यात एक बाई उभी असलेली दिसली. त्याला खूप आनंद झाला. मान खाली घातलेली, कमरेत वाकलेली, हात पदराआड झाकून घेतलेली ही बाई म्हणजे किष्णाच आहे असा त्याचा पक्का समज झाला. तिच्या बांगड्यांच्या आवाजाने तो खूप उत्तेजित झाला. किष्णाबाई आपणाला फसवणार असे त्याला वाटले होते, पण तसे घडले नाही. तिला व तिच्या सासूला पोसण्याची दामूची तयारी होती. तिला तो पानाचा विडा देवू लागला. त्याने दिलेले पान तिने स्वीकारले. ती आल्यापासून आपणाशी का बोलली नाही, ती रागावली का, असे प्रश्न त्याच्या मनात निर्माण झाले. तिची तो आराधना करु लागला. कवळी काकडी, पाडाचा आंबा, कबूतर, पेढा, बर्फी अशा हाका तो मारु लागला. तिला तो राणी म्हणू लागला. तिच्या अंगचटी येवू लागला. तेव्हा तिने पायातली चप्पल काढून दामूला बडविण्यास सुरुवात केली. म्हातारीचा आवाज दामूने ओळखला. किष्णाबाईच्या ऐवजी तिची सासू आली होती. तो अधमेला झाला होता. म्हातारी चपलेने पायावर मारत होती व त्याचेच शब्द त्याच्या तोंडावर फेकत होती. त्या मारामारीत त्याचा कासोटा पिटला. चपलांनी धोबाड रंगले. हातापायालाही मार बसला.

त्या सासूच्या हाताला त्याने हिसका मारला आणि पिकातून वाट फुटेल तिकडे तो पळत होता. त्याने मागे वळून थुकून देखील पाहिले नाही. रात्र असूनही त्याला घाम फुटला होता. ठेचकाळत, ठेचकाळत तो कसा तरी वेशीजवळ आला. तेवढ्यात केसूतात्या समोर आले व एवढ्यात तुझे काम कसे काय झाले ? असा प्रश्न त्यांनी विचारला. त्याला सगळे कळले, तो खजील झाला. महिनाभर तो अंथरुणाला खिळून राहिला होता. त्याच्या अंगात कापरे भरले होते. ते काही केल्या निघात नव्हते. त्याच्या वडिलांनी बरेच देव देवऋषी केले तेव्हा कुठे दामू हिंडायला फिरायला लागला. पण तो गावात काही हिंडला नाही. बैलाची व्यवस्था ठेवण्यासाठी तो कायमचाच रानात राहिला. सासूनांनी केलेली करामत दामूला भोवली हे खरेच.

'अग अग म्हशी' या कथेत नारायणाच्या लग्नाचा तिढा कसा सुटला हे पाहवयास मिळते. नारायणाला सरकोलीपर्यंत काही गाडी मिळालेली नव्हती. त्याला मिळालेली एस्.टी. ओझेवाडीपर्यंतच आलेली होती. तेथेच त्याला पाच-साडेपाच वाजले होते. त्यामुळे गावी येण्यास संध्याकाळ होणे स्वाभाविकच होते. तो गावात आल्यावर नारा आला, नारा आला असे म्हणत गावातील मुले त्याच्याभोवती गोळा झाली. देवळाच्या पायरीवर हरीबा मांग बसला होता तो लगबगीने पुढे झाला व नारायणाच्या हातातील बॅग त्याने घेतली.

रस्त्याने जाताना लोक विचारपूस करीत होते. खरे तर नारायण एकटाच त्या गावात शिकलेला होता. कलेक्टर एवढे शिक्षण झालेला. ताडफाड इंग्रजी बोलणारा. नारायण गावाच्या कौतुकाचा विषय होता.

तो घरी आला तेव्हा त्याची म्हातारी आपल्या थोरल्या मुलीच्या धाकट्या पोराला मांडीवर घेऊन खेळवत होती. म्हातारीची व नारायणची भेट झाली. नारायणने हातपाय धुतले व बहिणीला चहा ठेवण्यास सांगितला. भाच्यासाठी त्याने खाऊचा पुडा आणला होता. तो त्याने आईसमोर ठेवला.

गप्पा मारताना हरिबाने म्हातारीला पोळ्या केव्हा देणार? असे विचारले. नारायणानेही नाखुषीनेच आपल्याला लग्न करावेच लागणार आहे असे सांगितले. म्हातारी सूनमुख पाहण्यासाठी अधीर झाली होती. रुक्माने आईला दटावले. आपला भाऊ परगावाहून दमून आला आहे त्याला जरा विश्रांती घेवू द्यावी. नंतर सर्वांनी मिळून चहा घेतला. हरिबाही नारायणाचा निरोप घेवून निघून गेला.

आपला एकुलता एक लाडका शिकलेला धाकटा भाऊ आला म्हणून धावाधाव करुन रुक्माने मासे आणले व जेवणाचा छानसा बेत केला. जेवताना म्हातारी सांगत होती की आता आपले चार दिवस राहिले नाहीत. काठीशिवाय चालता येत नाही. जवळची गोष्ट देखील दिसत नाही. जिवाला एकच घोर लागला आहे आपल्या मुलाचे दोनाचे चार हात व्हावेत. बोलता बोलता म्हातारीला खोकल्याची उबळ आली. ती लवकर आवरता आवरेना. तिने लग्नाला घाई लावली. गावोगावचे पाहुणे सोयरिक घेवून येताहेत. शिंदेवाडीचा जाधव दहा हजार रुपये द्यायला तयार आहे. आपल्या या म्हणण्याने नारायणाच्या तोंडाला पाणी सुटेल असे तिला वाटले. पण तो गप्प होता. त्याने शांतपणे जेवण संपविले. नंतर दोघी मायलेकी जेवायला बसल्या. नारायण असे का वागतो याचे उत्तर त्यांना काही मिळत नव्हते. नारायणाच्या

कलाने घ्यावे असे रकमाने तिला सांगितले. चार दिवस म्हातारीने लग्नाचा विषय काढला नाही. त्याच्या मित्रांच्या लग्नाचे विषय ती काढत होती. असे सगळीकडे कडेने बोलणे चालले होते; पण एके दिवशी या विवाहाच्या चर्चेत नारायणाने मनापासून रस घेतला. रकमाच्या नव-याने एक स्थळ आणले होते; पण एवढे सगळे बोलणे होऊनही आपणाला एवढ्यात लग्न करायचे नाही असे नारायणाने सांगितले. आता आपण देवाघरी गेल्यावरच हा लग्न करणार अशा आशयाचे वाक्य म्हातारीने रागारागाने उच्चारले. आता नारायण व म्हातारीचे भांडण पेटेल. म्हणून रकमा भावाजवळ आली आणि खालच्या मायेच्या सुरात बोलू लागली. नारायणाचे म्हणणे असे. तुम्ही एवढ्या सगळ्या मुली सांगितल्या पण त्यातील कोणतीच मुलगी पसंत पडली नाही तर हा नारायणाचा प्रश्न होता. त्यावर म्हातारीने समजुतीखातर म्हटले की असे होणारच नाही. यातील एक तरी मुलगी नारायणाला पसंत पडेल. रकमाने नाराय-णाकडे पाहिले. आपल्या भावाचा चेहरा तर रागावलेला नाही; पण तो मनात काहीतरी विचार करतो आहे असे तिला वाटले. तेव्हा ती म्हणाली की यातली एखादी मुलगी पसंत पडली तर उत्तम होईल. नाहीतर तुला जी पसंत पडेल ती कर. रकमाच्या या म्हणण्याला म्हातारीने दुजोरा दिला. तेवढ्यात शेजारची पुतळा मावशी नारायण-साठी पावट्याची उसळ घेऊन आली. हातातील उसळीची वाटी तिने म्हातारीजवळ दिली. ही सगळी मंडळी गप्प बसलेली बघून पुतळाने उत्सुकतेने विचारले की आपण गप्प का ? यावर नारायणाच्या लग्नाच्या गप्पा चालल्या होत्या असे म्हातारीने सांगितले. नारायणने मग आई आपले लग्न का करते तर माझे सुख तिला महत्त्वाचे वाटते. मी एवढा शिकलेला तर आपल्याला ी बायको हवी असे नारायण म्हणू लागला.

शिकलेली बायकोच त्याला पाहिजे असे म्हातारी म्हणाली. बोरगावच्या पाटलांची मुलगी शिकलेली आहे.

पण ती खेड्यातील मुलगी जास्तीत जास्त सातवी शिकलेली असेल. इंग्रजी शिकलेली असणार नाही. मग इतर मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न निघाला. तर जेवढ्या मुली सांगून आल्या होत्या त्या सगळ्या अडाणीच होत्या तेव्हा पडते होत आई तुझ्या पसंतीची मुलगी कर असे सांगितले. आणखी एखादे वर्ष लग्न लांबवावे असे नारायण म्हणाला. त्यामुळे म्हातारी अधिकच रंजीस आली. शेवटी तुला जी मुलगी पसंत पडेल ती तू कर असे ती म्हणाली. एकदाचा नारायण लग्नाला तयार झाला. याचाच आनंद म्हातारीला झाला. रकमाचे तान्हे मूल कडेवर घेऊन म्हातारी घरोघर हिंडली. आता तिच्या घरी शिकलेली सून येणार होती.

एके दिवशी पंढरपूरच्या इंग्रजी शाळेत शिकलेल्या मुली असतील की, असे रकमाने नारायणला विचारले. जेवण झाल्यावर तो फोटो दाखवतो म्हणाला. त्याच्या सुटकेसच्या तळाशी असलेल्या मासिकातून त्याने तीन ते चार फोटो काढले. त्यापैकी तीन सामान्य नट्यांचे फोटो होते. एक फोटो वेगळाच होता. त्याने त्या सुंदर मुलीचा फोटो काढून घेतला व उरलेल्या तिन्हीपैकी कोणताही पसंत करा असे बहिणीला सांगितले. त्या तिन्ही फोटोवर हे ना ते कारण देऊन नारायणाच्या आईने नकार दिला. शेवटी ज्या सुंदर मुलीचा फोटो बाजूला काढला होता तो त्याने आईला दाखवला आणि आपणाला हा फोटो काही पसंत नाही असा अभिप्रायही दिला. पण म्हातारीला हा फोटो पसंत पडला. त्याने नाटक केले आणि हा फोटो आपणाला पसंत नाही असे

सांगितले. पण शेवटी ताई व आईला ही मुलगी पसंत आहे तर आपण हीच करू असे नाईलाजाने सांगितले. आणि त्याने मान्यता दिल्यावर तो फोटो घेऊन त्या मायलेकी शेजारच्या बायकांना तो फोटो दाखवण्यास गेल्या व नारायणाने आपल्या प्रेयसीस आईनी लग्नाला परवानगी दिली या आशयाचे पत्र लिहायला प्रारंभ केला.

खेड्यामधील जीवन व्यवहार हा सरळ कधी नसतो. त्या व्यवहारात अनेक तिढे असतात. त्याचे मनोहारी दर्शन 'वसुली' या कथेत घडते. सदा सुतार हा गावातला एक गरीब सुतार. त्याची नेहमी तारांबळ असायची. आर्थिक प्रश्न सोडवता सोडवता तो थकून जायचा. त्यामुळे एकाचवेळी अनेकाकडून त्याने पैसे उसने घेतलेले असायचे. या लोकांना तोंड देता देता त्याची तारांबळ उडायची. बाबूराव न्हाव्याकडे सदाने नुकतीच दाढी आटोपली होती. आणि तो निघणार तेवढ्यात गणपा पाटील तेथे आला. त्याने सदाला धरले व आपले पन्नास रुपये लवकरात लवकर देण्यास फर्मावले. गयावया करून सदाने पंधरा दिवस थांबण्यास सांगितले. गाय विकली की पहिल्यांदा सदा गणपा पाटलाचे पैसे देणार होता. तो खजील झाला होता. आता न्हाव्याच्या कट्ट्यावर झालेली ही गोष्ट सगळ्या गावात होण्यास वेळ लागणार नाही असे सदाला वाटले. तशात बाबू न्हाव्याने आगीत तेल ओतले. सदाने पंधरावीस माणसांकडून असे पैसे घेतल्याचे त्याने सांगितले.

गणपा पाटील रागाने लाल झाला. आत्ताच्या आत्ता पैसे मिळाले पाहिजेत असे त्याने सांगितले. सदाकडे पैसे नाहीत. आणि सदाकडे व्यायला आलेली एक गाय आहे. तीच तुमच्या पैशात घ्या

असा सल्ला बाबा न्हाव्याने दिला. दोनशे रुपयाला भगवान भोसल्यांनी ती गाय मागितल्याचे सदाने सांगितले. पण बाबा न्हावी म्हणाला की सदा खोट्या शपथा घेण्यात पटाईत आहे. शेवटी सदाबाबा न्हाव्यावर चिडला. गणपाने मनाशी काही हिशोब केला आणि व्याज व मुद्दल सोडून सदाला रोख पन्नास रुपये द्यायचे ठरविले. आणि गाय आपल्या दारात आणून बांधावी असे सांगितले. पण गणपा पाटलाने आपला हेका सोडला नाही. त्याने अनेक वेळा विनंती केली, पण ती काही ऐकली नाही. गणपा पाटलाने सदाच्या दावणीची गाय सोडून आणली व आपल्या रानातील वस्तीवर नेवून बांधली.

अवघ्या शंभर रुपयात आपण गाय मिळविली म्हणून गणपा व त्याची बायको खुशीत होती. त्याने तिघा चौघांना सदा सुताराला कसे गंडविले हे खुशीत येवून सांगितले. गायीला जर खोंड झाला तर उखाळच पांढरे होणार होते. त्या खोंडाचे सहजच एक हजार रुपये आले असते. गणपा पाटलाने मनातल्या मनात खोंड व्हावा म्हणून भैरोबाला नवसही बोलून टाकला.

गाय दारात आणून बांधल्यावर गणपा पाटील व त्याची बायको सारखी गाईची उस्तवारी करीत होते. ओली वैरण, पेंड चारत होते. तिला मायेने गोंजारत होते. पोटच्या मुलासारखी तिची काळजी घेत होते. बघाता बघाता आठ नऊ दिवस झाले व एका रात्री गाय व्याली. पण तिला कालवड झाली. त्यामुळे गणपाला वाईट वाटले. पण देवाने दिलेले आपण पत्करले अशी त्याने मनाची समजूत काढली. गणपा पाटील बायकोला म्हणाला आता मुलांना खाण्यासाठी गायीचे दूध काढ. बायकोच्याही मनात तेच होते. नाहीतरी सदाकडचे पन्नास

रुपये बुडणारच होते. तेव्हा त्या नुसत्या पन्नास रुपयाला गाय महाग नाही. दुधातुनाचे आपण पन्नास रुपये करु. असे आश्वासकपणे बायको बोलली. गायीने भरपूर दूध द्यावे म्हणून त्याने पंढरपूरला जाऊन सरकी आणली. भरडा ओला करुन घालण्यासाठी त्याचे एक पोते घेतले. मळ्यातील ओली वैरण भरपूर खायला घातली. एका वेळेला गाय दोन-तीन शेर दूध देईल असे त्यांना वाटले.

पहिले काही दिवस गेल्यावर त्याने धार काढायचे ठरविले. बायकोने मोठी कासंडी त्याच्या हातात आणून दिली. वासराचे दावे धरुन ती थांबली होती. पण चार सहा मिनीटे धार काढल्यावर मात्र धयाधया नाचू लागली. तिने गणपाला एक जोरात लाथ मारली. तो उताणा पडला. तो कसाबसा उठण्याचा प्रयत्न करु लागला तो शेणात भरलेला शेपटा तिने गणपाच्या थोबाडावर सणकावला. गणपा सोंगासारखा दिसू लागला. त्याच्या बायकोला हसू आवरेना. तो बायकोवर चिडला. पालथी पडलेली चरवी लाथेने त्याने ठोकरली. तो खोपटात येवून आडवा पडला.

या सगळ्यात वासराची चंगळ झाली. त्याला भरपूर दूध प्यायला मिळाले. दुसऱ्या दिवशी मुलाच्या मदतीने गणपाच्या बायकोने धार काढण्याचा प्रयत्न केला. तेव्हा गायीने तिच्या हाता-वरच लाथ मारली तिचा हात सुजला. बांगड्या फुटल्या. हात रक्ताने माखला तिचा अवतार पाहून थोरला मुलगा हसू लागला.

गायीने खरे तर घरातल्या दोन कर्त्या वीरांना जायबंदी केले होते. ती दररोज दोन बैलांचा चारा खायची. व वासराला निवांत

पाजायची. त्याला देखील सवण लागली; पण गणपाने आपण धार काढणार नाही हे निक्षून सांगितले. असेच दोन दिवस निघून गेले. सकाळच्या चहाला दूध नाही असे गणपाची बायको बोलली. दोघेही चिंताक्रांत झाले. यावर गणपाच्या बायकोने एक तोड काढली. तिच्या मते ही गाय सदा सुताराची आहे तेव्हा त्याला तरी ती दूध काढून देते का ते पाहावे. गणपाला हे पटले नाही. सदालाही गाय हात लावून देणार नाही असे त्याला वाटले. पण एकदा प्रयत्न करावाच असे गणपाची बायको आग्रहाने बोलली. समजा सदाला धार काढून दिली तर काय करायचे हा पेच गणपापुढे होता. त्यावर त्याच्या बायकोचे म्हणणे असे की, सकाळ संध्याकाळ धार काढण्यापुरते त्याला बोलवायचे. तो आपल्याला नाही म्हणणार नाही असे गणपाच्या बायकोला वाटले.

सदाच्या घरी गणपा आल्यावर सदाला आश्चर्य वाटले. पाटलाने आपली अडचण सांगितली. सकाळ संध्याकाळ सदा धार काढण्यासाठी आला; तर बरे होईल असे सांगितले. सदाचे म्हणणे असे पडले की, त्याला गावाचे भरपूर काम आले आहे त्यातून त्याला सवड मिळणार नाही. गणपा पाटील त्याने यावे असा आग्रह करीत होता. तर रानातील वस्ती, लांबचा पल्ला अशा अडचणी सदा सांगत होता. चार, आठ दिवस सवय लागेपर्यंत सदाने यावे नंतर आपण धार काढू असे पाटलांनी सांगितले. गणपा पाटील गयावया करीत होता. हात जोडून विनंती करीत होता. शेवटी सदाने होकार दिला. गणपाने आज संध्याकाळीच येण्यास त्याला सांगितले.

अंधार पडल्यावर सदा वस्तीवर आला. गायीनेही सदाकडे

ओळखीच्या नजरेने पाहिले. तिने त्याला धार काढू दिली. भरलेली गरम चरवी गणपाच्या बायकोने हातात घेतली व गायीने किती दूध वाया घालविले याबद्दलची खंत तिने प्रकट केली. गणपाने मग सदासाठी आपल्या बायकोला चहा करण्यास सांगितले. पान दिले, तंबाखू दिली. थोडक्यात सकाळ संध्याकाळ सदा गणपाच्या वस्तीवर जाऊ लागला. लवकर गेले तर गाय धार द्यायची नाही. तिच्याशी हुज्जत घालावी लागेल. सदाला परत एकटे जायचे याचे दुःख होत होते. भीती वाटत होती. अंधार भरपूर होता. गावाजवळच्या ओढ्यात लागीर असल्याचे सदाने ऐकले होते. तो परत जायला का कू करु लागला. तेव्हा गणपाने त्याला मुक्काम करण्यास सांगितले. सकाळी धार काढून त्याने घरी जावे असे गणपा म्हणाला. घरी वाट बघतील असे सांगण्याचा त्याने प्रयत्न केला; पण गणपाने आग्रह केल्यावर तो राहिला. दोन तीन दिवस असे झाले पण गणपा म्हणाला गावाला गेलो असे सगळ्यांना सांग व येथेच मुक्कामाला ये. तो आढेवेढे घेऊ लागला. दोन वेळेला चापून खायचे व धारा काढायच्या एवढाच उद्योग त्याला तेथे होता.

असे दोन दिवस गेल्यावर सदा या कामावर खूषच झाला. त्याच्या हाताची सवय झाल्यामुळे गायही भरपूर दूध देत होती. तीन वेळा जेवावे. चहा प्यावा. विहीरीजवळ झाडाखाली झकास झोप घ्यावी. पाटलाचीच पान तंबाखू खावी. असे त्याचे चालले होते.

असे तीन चार दिवस गेले आणि एके दिवशी सदाचा मुलगा दाम्या वस्तीवर आला. आई्ने बोलावले आहे. सुतारकामाची माणसे येतात असे त्याने सांगितले. गणपाने- सदाने माणसाची फिकीर करु नये

असे सांगितले, पण दामू चिडला होता. आपल्याला लोक सारखे भंडावून सोडतात असे रागाने तो बोलला. सदा काळजीत पडला. लोकांचा खोळंबा होत आहे हे सदाला दिसत होते. शेवटी दामूने स्वत:हून विचारले आईला आता काय सांगायचे ? त्यावर गणपाने तोड काढली. दामूने इथेच राहवे म्हणजे कटकट मिटेल. गणपाने त्याला होकार दिला. नंतर सदालाही हे म्हणणे पटले.

दोघेही बापलेक मस्तपैकी जेवले. दामू दूध पीत होता. संध्याकाळी धार काढल्यावर सदाने आपले अंग रात्रीपासून ठणकते आहे अशी गणपाकडे तक्रार केली. सुंठीचा तुकडा टाकून चहा करण्यास सांगितले. तो चहा दाम्यानेच पिऊन टाकला. सकाळी दोघेही बापलेक पुन्हा जेवले. गणपाच्या मुलांना खायला दूध, ताक मिळेना. असे मजेत तीन चार दिवस गेल्यावर सदाची दोन मुले वस्तीवर आली. एकाचे वय आठ वर्षे तर दुसरे चार वर्षांचे होते. दोन्ही मुले रडत होती. या दोन्ही मुलांनी आपल्या वडिलांचा दोसरा काढला होता. आलेली ही दोन्ही मुले इथेच राहणार होती. गणपाच्या बायकोचा चेहरा मात्र पाहण्यासारखा झाला. त्या मुलांना भूक लागली होती. दाम्याही त्यांच्याबरोबर जेवायला बसला. मुलांचेही नखरे होते. त्यांना जेवणात तिखट चालत नव्हते. गूळ, दूध हवे होते. त्यात मुलांची भांडणे झाली. दूध वाढलेले जमीनीवर सांडले. शेवटी सदाने मुलांना शांत केले. पाटलीणबाईंनी उरलेसुरले दूध सदाच्या मुलांना खाऊ घातले. तिन्ही मुले झाडाखाली पसरलेल्या सदाजवळ येऊन खेळू लागली. वडील धार काढत असताना ती दूध पीत होती. जेवताना दही खात होती. पाटलीणबाईंला दिवसभर भाकऱ्या भाजाव्या लागत होत्या.

पाच,सहा दिवस असे गेले. गायीचा भारडा संपला म्हणून तो आणण्यासाठी गणपा पाटील पंढरपूरला गेला. नंतर सदाची बायको वस्तीवर आली. ती रडू लागली. सदाही रडू लागला. पाहुण्यापैकी कुणी वारले की काय अशी शंका सदाला आली. पण तरी तो रडत होता. पाटलीणबाई समजूत काढीत होती. शेवटी सदाने बायकोला शांत केले. सदा गेल्यापासून आपल्याला करमत नाही म्हणून ती रडत होती. असा शेवटी खुलासा झाला. ती ही वस्तीवरच राहायला आली होती. तिने चार दिवस इथे राहवे. इथे सगळ्या गोष्टी मुबलक आहेत असे सदाने सांगितले. सगळेजण गणपाचा पाहुणचार घेवू लागले. सात आठ दिवस असे गेले. गणपा व त्याची बायको काम करुन थाकत होती. शेवटी गणपा सदाला म्हणाला की, मला तुझे पन्नास रूपये नकोत. ही गाय तू परत घेऊन जा. आपल्याकडे कडबा, भारडा नसल्या-मुळे गाय कशी न्यायची असा प्रतिप्रश्न सदाने केला आणि दुसरी गोष्ट म्हणजे मुलांची प्रकृती सुधारते आहे. बायकोही येथे आहे. एवढे म्हणून त्याने दाम्याला ताक आणायला सांगितले.

'सोबत' ही सामान्य माणसाचे स्थान रंगवणारी कथा आहे. या कथेचा नायक प्राध्यापक आहे. विद्यापीठाच्या कामासाठी तो कोल्हापूरला निघालेला आहे. एस्.टी.ने सांगली शहर सोडल्यावर नायक संपूर्ण वाचलेला पेपर वेळ घालविण्यासाठी पुन्हा वाचत होता. गाडीमध्ये नायकाच्या शेजारीच एक इसम उभा होता. त्यानेही पेपरमध्ये डोके खुपसून वाचनाला सुरुवात केली. नंतर हळूच तो नायकाच्या सीटवर बसला. त्याच्या बोलण्यात अत्यंत नम्रता होती. नायकाच्या पलीकडे एक म्हातारी बसलेली होती. तिनेही अंग चोरून त्याला बसण्यास

जागा दिली.

त्या प्रवाशाने आभार मानले. हल्ली एवढी माणुसकी कुणी दाखवत नाही अशी त्याने तक्रार केली. नायकाने त्याला वाचायला पेपर दिला. नि:संकोचपणे तो पेपर वाचू लागला. त्याच्या एकंदर कपड्यावरून हा सामान्य माणूस असावा असे वाटत होते. त्याने कोठे निघालात वगैरे चौकशी केली. आपण गप्पा मारत प्रवास करू असेही सांगितले. जयसिंगपूरला शेंगदाण्याच्या दोन पुड्या त्याने घेतल्या. एक पुडी बळेबळेच नायकाच्या हातात दिली. कोल्हापूरला कोणत्या कामासाठी निघालात, या आशयाचा प्रश्न त्याने टाकला. विद्यापीठात काम आहे असे उत्तर नायकाने दिले.

तो अत्यंत उल्हासित झाला. विद्यापीठाचे कुलगुरु आप्पासाहेब पवार नायकाच्या परिचयाचे असतील असे समजून तो बोलत होता. त्यांची व आपली ओळख आहे. त्यांच्याकडे आपले जाणे येणे आहे असेही त्याने सांगून टाकले. नायकाच्या चेहऱ्यावरील भाव पाहून त्याने स्पष्टीकरण दिले की आप्पासाहेब पवार त्याचे नातेवाईक आहेत व त्याच्या सासऱ्याचे जवळचे मित्र आहेत.

आपले कपडे अगदी साधे आहेत त्यामुळे आपल्या म्हणण्यावर कुणाचा विश्वास बसत नाही हे खरे; पण याला कारण त्या गृहस्थाचे सासरे होते. कारण ते सतत साध्या राहणीचा आग्रह करीत.

आपले सासरे साखर कारखान्याचे संचालक आहेत. समाजातील ती एक बडी आसामी आहे. शेती, मोठे आडत दुकान असा त्याचा पसारा आहे; पण वागणे साधे. त्यांच्या घरी गाडी असून ते गाडीने न जाता पायी चालत जातात. या दोघांचे बोलणे ती म्हातारी देखील

कुतूहलाने ऐकत होती.

बोलण्याच्या ओघात आपणाकडे गाडी आहे असेही त्याने सांगून टाकले. असे असताना आपण आज एस्.टी.ने आलो. कारण सासऱ्यांना मुंबईला जायचे होते म्हणून त्या गृहस्थाला गाडी दिली होती. आता कोल्हापूरी ते गृहस्थ नव्या बिझनेससाठी,सासऱ्यांशी चर्चा करण्यासाठी निघाले होते. मग बोलता बोलता आमच्या व्यवसाया-पेक्षा तुमची नोकरी कशी बरे हे सांगण्यास त्याने सुरुवात केली. तो आपल्या धंद्याविषयी बोलत होता. पण त्या बोलण्यात तिरस्कार अथवा वैताग नव्हता. तो प्रसन्नपणे बोलत होता.

हार्डवेअरचा धंदा करण्याची त्याची इच्छा होती; पण सासऱ्यांचे म्हणणे की, हार्डवेअरच्या धंद्याला मंदी आहे. जावईबापूंनी सरळ एक प्लॅस्टिकचा कारखाना टाकावा. त्या दोघांच्या चर्चेतून दोन्हीही धंदे चालवावयाचे ठरले. एका धंद्याचा प्रमुख नायकाला करावे असा त्याने प्रस्ताव ठेवला. नायकाला या गोष्टीचा पटकन निर्णय घेता येत नव्हता; हे त्यांचे बोलणे शेजारच्या म्हातारीने ऐकले. आपल्या नातवाला त्याने नोकरी लावावी. अशी तिने गळ घातली. त्यासाठी काही पैसेही खर्च करण्याची तिची तयारी होती. बोलता बोलता हातकणंगले स्टॅन्ड आले. दोघांनी मिळून चहा घेण्याचे ठरविले.चहापान, सिगरेट सगळ्याचे पैसे त्या माणसाने दिले. नोकरीपेक्षा धंद्यात पैसा अधिक मिळतो हे त्याला मान्य होते. पण कामगारांचा संप त्यांच्या संघटनांचे तसेच सरकारचे आडमुठे धोरण यावर तो घसरला.

सासरे कुठे राहतात असा प्रश्न नायकाने केला. त्यावर त्याने लगेचच त्याच्याबरोबर नायकाने यावे असे म्हटले. विद्यापीठातील अर्जंट

कामामुळे नायकाने त्याच्याबरोबर जाण्यास नकार दिला. बघता बघता पंचगंगेचा पूल आला. गाडी कमी वेगात चालत होती. कारण रस्त्यावर गर्दी वाढली होती.

शेवटी कोल्हापूरच्या स्टॅन्डवर ते उतरले. प्रवासातला आपला दोघांचाही वेळ चांगला गेल्याची कबुली दोघांनीही दिली. पण नंतर खाली मान घालून त्याने सांगितले की आत्तापर्यंत तो जे बोलला ते सगळे खोटे होते. सांगली स्टेशनवर आलेपाक विकणारा तो साधा विक्रेता होता. त्याने आलेपाकची वडी नायकाच्या हातात दिली. बघता बघता तो गर्दीत दिसेनासा झाला. नायक गर्दीत त्या माणसाला शोधत होते.

'मी भाषणाला जातो' या कथेत भाषणाला जाताना नायकाला जे अनुभव येतात त्याचे चित्रण येते. नायकाच्या शेजारची मंडळी भाषणे देतात याचा फार त्रास झाला. शेजारच्या यशोदा-काकूंनी आजच्या स्त्रियांची कर्तव्ये या विषयावर इयत्ता पहिल्याच्या चाळीस मुलींसमोर वीस मिनिटे भाषण केले. आणि ही भाषणाची वार्ता त्यांनी बायकांना घरी बोलावून आग्रहाने चहा पाजून सांगितली. त्यांच्या वाड्यात एक छोटूकाका होते. भजनीमंडळात एकदा प्रमुख पाहुणे न आल्याने छोटूकाकांना व्याख्यान द्यावे लागले. त्यामुळे ते स्वतःला भलतेच विद्वान मानू लागले होते. एखाद्याशी बोलण्याअगोदर आपण भाषण केल्याचे आवर्जून सांगत होते. आणि इतरांपेक्षा आपण कसे मोठे आहोत ते दाखवत होते. खाद्यपदार्थांच्या चढाओढीसाठी स्पर्धा होती त्यात देशमुखीण बाईंनी खूपच मदत केली तेव्हा त्यांना स्वागतपर भाषण करण्याची संधी इतर बायकांनी चुकून दिली. मग

त्यांनीही दहा ते बारा मिनिटांचे पांडित्य प्रचुर व्याख्यान दिले व तेही साभिनय. त्याचा विशेष फायदा असा झाला की, सर्व भगिनींना रात्री कमालीची भूक लागली. या नायकाच्या पत्नीने कुणाचे तरी भाषण ऐकले आणि ती आपल्या नवऱ्यावर कडाडली. प्रोफेसर असून नुसते तुम्ही मुखदुर्बळ आहात. रामभाऊ रोज एक तरी भाषण देतात. त्यावर तिने हुज्जत घातली व इतर बायका म्हणतात तुम्हाला बोलता येत नाही असे तिने सद्गदित होवून सांगितले. मग नायकाने भाषण करावयाचेच असा चंग बांधला.

मनातल्या मनात नायकाने भाषणाची खूप तयारी केली. कुठे टाळ्या द्यायच्या कुठे हसवायचे, लोकांनी हुर्यो केली तर कसे तोंड द्यायचे हे सगळे ठरविले. आरशासमोर उभे राहून जर भाषणाची तयारी केल्याने कुणीतरी मोठा वक्ता झाला होता असे वाचले होते मग या नायकाने भाषणाचा चांगलाच सराव केला. शेवटी त्याला जाणवले की, आपण हजारो लोकांसमोर भाषण करु शकतो.

चाळीमधील प्रत्येक सभा नायक गाजवू लागला. वत्सलाबाईच्या मुलीला सासरी पाठवताना सभा झाली तेव्हा या नायकाने साश्रू व हुंदक्यासह भाषण केले. चाळीतील गणोबा पोटफोडे स्वच्छता समितीचे सभासद म्हणून निवडून आले तेव्हा नायकाने सत्कार सभा घेतली व आभाराचे दणादणीत भाषण ठोकले. आभार न मानण्याची चूक तेवढी त्या भाषणात राहून गेली. याच गणोबांना पाच मुलीनंतर मुलगा झाला म्हणून सत्कार करण्यात आला. त्यांची चिकाटी, सहन-शीलता व आशावादी वृत्ती याचे कौतुक करणारे भाषण नायकाने

केले. त्या भाषणात चुकून भारतातील बालमृत्यूच्या मोठ्या प्रमाणा-विषयी नायक बोलले. हा नायक आपल्या भाषणाने कोणताही प्रसंग साजरा करतो अशी जणू सर्वांना खात्री पटली तेव्हा वत्सला-बाईच्या रेखाचा इयत्ता दुसरीत पाच विषयात नापास होऊनही पासात तिसरा नंबर आला तेव्हा तिचे अभिनंदन करण्यासाठी वत्सला-बाईंनी नायकाला कॉफी पाजली व बोलण्याची विनंती केली वत्सलाबाई काय अथवा सौ.पोटफोडे काय या सगळ्यांना हा नायक म्हणजे महाराष्ट्रातील श्रेष्ठ दर्जाचा वक्ता आहे असा साक्षात्कार झाला.

नायकाची प्रसिध्दी हळूहळू आसपासच्या भागात झाली. विविध लोक भाषणासाठी आमंत्रणे देवू लागले. पांड्या गवळ्याची म्हैस दूध देत नव्हती. तिला चार शब्द सांगण्याची त्यांनी नायकाला गळ घातली. शेजारची कुत्री रात्रभर भुंकत असे तिच्याशीही नायक हुज्जत घालत बसला. गणोबाच्या चार कोंबड्यांनी अंडी न देण्याचा संप सुरू केला होता त्यावेळी गणोबाला नायकाने मदत केली होती.

अशा छोट्या छोट्या सभा नायक गाजवत होता. त्याची कीर्ती पसरत होती. तरी पत्नीला त्या गोष्टीचे एवढे कौतुक नव्हते. तिच्या मते मोठ्या सभांना काही कोणी या नायकाला बोलावत नाही. पत्नीचे हे आव्हान नायकाने स्वीकारले. आणि सर्व शाळांना पत्रे लिहिली. कोणत्याही निमित्ताने आपले व्याख्यान ठेवावे असे त्यात नमूद केले. प्रवासखर्च घेणार नाही. चहाकॉफीचा खर्चही स्वत: करेन. श्रीफळ आपणासाठी ठेवेन असे सांगितले. पण कोणीच बोलावले नाही. टिळक पुण्यतिथीला तरी कोणी बोलावतील असे वाटले होते पण कोणीच बोलावले नाही.

१५ ऑगष्ट हा तर सर्वांच्या उत्साहाचा दिवस. तेव्हा नक्की आमंत्रण येईल असे वाटले होते. त्यासाठी मोठमोठ्या लोकांची भाषणे पाठ केली होती. नेहरूंचे ४७ चे व्याख्यान पाठ केले होते. पण ही सगळी तयारी वाया गेली. शेवटी गणेशोत्सवाचा सोहळा आला. हा सोहळा शाळा शाळातून साजरा केला जातो. एक प्रकारची स्पर्धाच असते. त्यामुळे त्या काळापुरती व्याख्यात्यांची टंचाईच असते. आणि त्यामुळे आरडगाव खुर्द या शाळेचे भाषणाचे आमंत्रण आले.नायकाची पत्नी एक वेळेला त्या आमंत्रण पत्रिकेकडे कौतुकाने तर एक वेळेला नायकाकडे कौतुकाने पाहत होती.

हे आरडगाव खुर्द तसे लांब नव्हते, नायकाच्या गावापासून वीस-बावीस मैल दूर होते. व्याख्यानापूर्वी चांगले दोन दिवस नायकाने भाषण पाठ केले. कोठे टाळ्या घ्यायच्या हे ठरविले. दोन तीन वेळा स्वयंपाकघरात पत्नीसमोर ते व्याख्यान म्हणून दाखवले. शेवटच्या दिवशी सकाळी दूधवाली आली तिला थांबवून घेतले व ते तयार भाषण तिला फाडफाड म्हणून दाखविले. भाषण कसे झाले या विषयीच्या तिच्या प्रतिक्रिया काही कळल्या नाहीत. पण वेड्यावानी बरळणाऱ्या मास्तरांना ठाण्याला नेवून दाखवावे असा सल्ला तिने पत्नीला दिला.

शेवटी आरडगाव खुर्दला जाण्याचा दिवस उजाडला. नायक हवेतच तरंगत होता. व्याख्यान दुपारी होते. सर्व तयारी करून नायक सकाळी नऊलाच निघाला. जाता जाता वत्सलाबाई,पांडोबा,गणोबा यांना भेटून आपण व्याख्यानास जात आहोत याची जाहिरात नायकाने केली. बस स्टेशनवर आल्यावर गाडीची चौकशी केली.गाडी गेली होती. तरडगावची गाडी लागली होती. तेथे उतरलो. आरडगाव

तेथून जवळच होते. हात फिरवीत तिकडे आरडगाव आहे असे एकाने सांगितले. एका माणसाच्या हातात सायकल होती. त्याला कोणते आरडगाव हा प्रश्न पडला, कारण समोर दोन डोंगर होते. त्या दोन्ही डोंगराच्या पलीकडे दोन आरडगाव होते. शेवटी जवळ कोणते व मोठे कोणते अशी माहिती काढली व जवळच्या आरडगावला जायचे ठरविले. तेव्हा एकजण म्हणाला की सायकलवरून तुम्ही जावे; पण आपणाला सायकल कोण देणार असा प्रश्न नायकापुढे उभा राहिला. पण त्याच माणसाने तो प्रश्न सोडविला. त्याने आपली जुनी सायकल दिली. पदरचे पैसे खर्च करून नायकाने तिच्यात हवा भरली.

सायकलवर बसताना दोनदा नायक व सायकल दोघेही खाली आदळले. पुढे कसेतरी बसण्याचा प्रयत्न केला. हळूहळू सायकल पळू लागली. पण पुढे सायकलवरचा ताबा सुटला आणि नायक एका काट्याच्या झाडूड्यात आदळला. कसेतरी त्याने स्वतःला सावरले आणि सायकलवर बसणे काही शक्य नव्हते.कारण दोन्ही चाकांच्या धावा चपट्या झाल्या होत्या. जराही हवा नव्हती. सायकल खांद्यावर घेऊन नायक चालला होता. गावातील लोक हसत होते. पण एका सज्जन माणसाने नायकाला पाणी पाजले. काय काम काढले म्हणून विचारपूस केली व शाळेत व्याख्यानासाठी हे पाहुणे आले आहेत असे समजल्यावर या आरडगावला शाळा नाही ते दुसरे आरडगाव आहे. एका डोंगराकडे त्या माणसाने हात दाखविला व त्या डोंगरापलीकडे आरडगाव असल्याचे सांगितले. नायकाच्या डोळ्यांपुढे काजवे चमकत होते. त्यामुळे बराच वेळ तो डोंगर काही त्या नायकाला दिसला नाही.

'लाल त्रिकोण' या कथेत लक्षात येते की, आपल्या देशात निरक्षरता भरपूर असल्यामुळे कोणत्याही चांगल्या गोष्टीचा प्रचार करावयाचा म्हटले की अनेक अडचणी येतात. पण समाजात काही माणसे अशी असतात की ज्यांना सामाजिक कार्याची हौस अधिक असते. यात हौस अधिक व कार्य कमी अशी स्थिती असते. कुटुंब नियोजनाच्या प्रचारात कोणकोणत्या गमती जमती घडून येतात तेच या कथेतून पाहवयास मिळते.

आपला देश हा सतत जगात याचक म्हणूनच का मानला जातो याची चर्चा नायक व मित्रमंडळी यांच्यात चालू होते. चर्चेच्या शेवटी याला वाढती लोकसंख्या हे कारण आहे असे वत्सलाकाकूंनी सांगितले. आपला मुद्दा पटवून देण्याला त्यांना स्वतःचे उदाहरण पुरेसे होते. त्या प्रथम एकट्या होत्या. नंतर वसंतराव पती म्हणून आले आणि घरात अकरा मुले अशी स्थिती आणि कुटुंबनियोजनाचा प्रचार त्या सतत करीत होत्या.

नियोजनाची ही फिलॉसॉफी आम्हाला पटली होती. त्यांच्या मंडळाने मुले दोन असावी की तीन असावी. दोन व तीन याचे अर्थ या बाबतीत नियम केले व त्याची अंमलबजावणी सुरु केली. हा प्रचार फक्त आपणापुरताच मर्यादित ठेवणे या मंडळींना मान्य नव्हते. समाजात ठिकठिकाणी जाऊन प्रचार कार्य केले पाहिजे असे सर्वांनी ठरविले. या मंडळाचे वत्सलाकाकू व भुजाभाऊ हे दोन नेते होते. प्रथम त्यांनी भजनी मंडळ गाठले. तेथे दोनशे स्त्रिया होत्या. त्यांची वये साठाच्या आसपास होती. असे भुजाभाऊ व वत्सलाकाकूंच्या व्याख्यानाआगोदरच एका बाईने सांगितले पण त्यातली खोच त्यांच्या लक्षात आली नाही.

व दोघांनीही बराच वेळ भाषण केले.

तेथून ही मंडळी पेन्शनरांच्या क्लबवर गेली. तेथे बरीच मंडळी सापडली. मग त्यांना वैयक्तिकरीत्या व सामुदायिकरीत्या कुटुंबनियोजनाचे महत्त्व पटवून दिले. त्यातील काहीजण विधुर होते. त्यातील काहींनी आमच्या कुटुंबाची सोय करून द्या अशी मागणी केली. त्या मागणीचा लवकर व सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचे आश्वासन देवून हे मंडळ चाळीतील इतर ठिकाणी फिरते. त्यात विधवा स्त्रियांनी चालवलेला एक गृहउद्योग कारखाना होता. तेथील सर्व विधवांनी या कार्याला संपूर्ण पाठिंबा जाहीर केला व जाताना प्रत्येकाला पापडाचा एकेक पुडा दिला. हा फायदा अकल्पित होता.

एवढे कार्य केल्यावर मंडळ समाधानी झाले असे नाही. छोट्या-पाड्यातून आपण प्रचार केला पाहिजे असे मंडळाला वाटते. आणि दर आठवड्याला एका गावी जायचे त्यांनी ठरविले. जाताना बरोबर नियोजनाचे फलक, जेवणाचा डबा इत्यादी गोष्टी त्यांनी घेतल्या होत्या. एका गावात गेल्यावर सर्वांनी प्रथम भोजन घेतले. विश्रांती घेतली. दिवस सुगीचे असल्याने सर्व लोक शेताकडे गेले होते. काही बायका नदीवर पाण्यासाठी निघाल्या होत्या. त्यांना भेटावे म्हणून भुजाभाऊ धावत गेले. नायक व वत्सलाबाई पाठीमागून गेले. 'नमस्कार मातांनो' असे म्हणत भुजाभाऊंनी त्यांना कोपरापासून नमस्कार केला. त्यांचे म्हणणे काय असे त्या बायकांनी विचारताच चिंतोपंतांनी कुटुंब नियोजनाच्या प्रचारासाठी आम्ही आलो आहोत असे सांगितले. तिकडे दहा-बारा म्हाताऱ्या बायका बसल्या आहेत त्यांच्याकडे जावे असे त्या

बायकांनी सुचविले पण भुजाभाऊंनी शिकस्त केली. आम्ही त्यांना सांगूच पण तुम्हालाही आम्हाला सांगावयाचे आहे असे भुजाभाऊ म्हणताच एक बाई माघारी वळली व तिने तोंडाचा पट्टा सुरु केला. सासूचे दरवर्षी बाळंतपण असते व त्याच्या खस्ता आपणाला खाव्या लागतात असे ती बाई बोलली. त्या बायका जे प्रश्न विचारीत होत्या त्यांना या मंडळातील लोकांना नीट उत्तरे देता येत नव्हती. एका बाईचे यजमान मिलीटरीत होते ते दोन वर्षांतून एकदा येत. तिच्या जावेला पाच मुले होती. भाऊबंदकीचा प्रश्न होता. थोडक्यात कुटुंब नियोजनाचा प्रचार करताना असे अनेक गोष्टींना तोंड द्यावे लागत होते.

ही मंडळी सावलीला अस्ताव्यस्त पसरली असताना एक प्रौढ माणूस तेथे आला व त्याने चौकशी करण्यास सुरुवात केली. त्याला वाटले ही तमासगीर मंडळी आहेत. पण कुटुंब नियोजनाचा प्रसार करण्यासाठी ही मंडळी आली आहेत. हे कळल्यावर त्याने आपल्याला पाच मुले असल्याने आपला केवढा फायदा झाला आहे सांगण्यास सुरुवात केली. चिंतोपंत चिकाटीने दोन मुले असणे कसे हिताचे आहे हे पटवून देत होते. पण रोगामध्ये एक मूल मेले व एक मूल मुके,पांगळे अथवा वेडे निघाले तर काय करावयाचे या त्याच्या प्रश्नाला मंडळाकडे उत्तर नव्हते.

खरे तर या प्रचार मोहीमेत मंडळाच्या सदस्यांना प्रत्येक ठिकाणी हार खावी लागली होती. पण ते चिकाटीला कमी पडणारे नव्हते गावात जाऊन आपण प्रचार करावा असे त्यांनी ठरविले. प्रथम त्यांना मराठी शाळा दिसली. मुले म्हणजे आयते श्रोते. त्यामुळे नायकाची भाषणासाठी जीभ वळवळू लागली. शाळेत जाऊन पाहतात तो शाळेत शिक्षक नव्हते.पलीकडे रमीचा डाव चालला होता. त्यात

गुरूजी मंडळी अडकली होती. शेवटी चौथीच्या वर्गात मंडळ सदस्य गेले. त्या वर्गाचे शिक्षक धावत आले. सर्वांना स्पेशल धडा देतो. एवढा डाव संपेपर्यंत भाषण द्या. प्रश्न विचारा. मुले खूप हुशार आहेत.
असे ते म्हणाले.
वर्गामध्ये वत्सलाबाई प्रथम बोलायला उभ्या राहिल्या आणि आपण कुटुंबनियोजनाची माहिती सांगणार आहोत अशी त्यांनी प्रस्तावना केली. त्यावर परीक्षेला किती मार्काचा प्रश्न यावर येणार असे एक मुलगा बोलला; तर दुस-याने आपल्याला या विषयाची माहिती आहे असे सांगितले. लाल त्रिकोणाची आपल्याकडे वीस चित्रे आहेत असे त्याने सांगितले. अग मुलांनी बाईंना अडचणीत आणणारे प्रश्न विचारले, शिक्षकांनीही अती उत्साहाच्या भरात नको ते बोलण्यास सुरुवात केली. बाईंना चक्कर आली त्या मटकन खाली बसल्या. नायक पाणी आणण्यासाठी धावला. तोंडावर पाणी शिंपडल्यावर त्यांना बरे वाटले. त्या शिक्षकांना नेमके काय झाले ते कळले नसावे. बाईंनी उद्या यावे व मुलांना शिकवावे असे ते म्हणाले. शिक्षकाचे अर्धे लक्ष पत्त्याच्या डावात होते. आपला डाव अपुरा राहिला याची खंत त्यांनी व्यक्त केली.

हे सगळे पाहून मंडळाच्या सदस्यांनी परतायचे ठरविले. हे नियोजन खेड्यात करणे सोप काम नाही याची मात्र सर्वांना खात्री पटली. ही मंडळी गावाच्या वेशीवर आली. तेवढ्यात एक मुलगा धावत आला. तुमच्याकडे काही साहित्य असेल तर द्या असे त्याचा थोरला दादा विचारतोय असे म्हणाला. हे ऐकल्यावर मंडळाचे सदस्य मागे न पाहता पुढे पळत सुटले.

'सोबत' या कथेत पंढरपूर ते नगर या प्रवासात नायकाला आलेले अनुभव येथे पाह्यला मिळतात. पंढरपूर स्टॅन्डवरून बस हलणार तोच

नायक तेथे जाऊन पोहचला व त्याने रिझर्व्हेशनचा कागद कंडक्टरच्या हातात दिला आणि कंडक्टरने बेल वाजविली. नायकाच्या एका हातात सुटकेस होती तर दुसऱ्या हातात दोन दिवाळी अंक व दोन वृत्तपत्रे होती. आपल्या सीटवर जाईपर्यंत नायकाचा पाय अनेक प्रवाशांच्या पायावर पडत होता. व त्याच्या वाटयाला शिव्या येत होत्या. रिझर्व्हेशन करतावेळी व घराकडून स्टॅन्डवर येताना नायकाच्या मनात एक विचार तरळून गेला होता की, आपल्या शेजारच्या सीटवर फडक्यांच्या कादंबरीतल्या नायिकेप्रमाणे एखादी मुलगी असावी. नायकाचा रिझर्व्हेशनचा क्रमांक पाच होता व त्याची छाटयाळ नजर सहा नंबरकडे गेली तर आश्चर्याची गोष्ट म्हणजे तेथे एक युवती बसलेली होती.

नायक जागेवर बसला आणि पायाला सुटकेस लागू नये म्हणून ती सुटकेस तिच्या बाजूला सरकावली. 'तुमची बॅग माझ्या पायाला लागतेय.'[४] अशा अर्थाने तिने बॅगकडे पाहिले. नायक हातातल्या वृत्तपत्राने वारा घेत चोहीकडे पाहू लागला. तर समोरच्या बाजूला पिळदार मिशा व बलदंड शरीर असलेले दोघे पैलवान बसले होते त्यांना पाहताच नायकाला घाम सुटला. मागच्या बाजूला पाहिले तर वारकरी मंडळी बसली होती. पंढरपूरची कार्तिकी वारी नुकतीच संपली होती. उरले सुरले वारकरी परतत होते. ते समोरचे पैलवानदेखील त्या युवतीकडेच पाहत होते. रस्ता, रस्त्यावरची धूळ, खड्ड्याविषयी नायक तिला ऐकू जाईल असे बोलत होता, पण ती काहीच दाद लागू देत नव्हती, नायकाला वाईट वाटले. वर्तमानपत्राची घडी उलगडून ते वाचण्यास नायकाने सुरुवात केली. दिवाळी अंक मांडीवर असे ठेवले की, सहज घसरून खाली तिच्या बाजूला पडावेत. पण ती काही लक्ष देत नव्हती. बराच वेळ ती खिडकी-

बाहेर पाहत होती. पण नंतर ती सरळ बसली. तिला आपणच बोलते करावे असे नायकाला वाटले. आणि कुठं जायचं आपणाला ? असा प्रश्न त्याने केला. नगरला असे तिने तुटक व शिष्ट उत्तर दिले. ती आपल्या कोणत्याच बोलण्याला दाद देत नाही हे पाहिल्यावर मोटारीचा धक्का बसला असे भासून नायक तिच्या बाजूला कलंडला. आणि उजवा हात तिच्या अंगाला स्पर्शून गेला. दिसत नाही का ? रेडाच्या बैलासारखे काय पसरलात सीटवर ? [१६] असे तिने सुनावले. ओठातल्या ओठात मूर्ख कुठले ? असेही ती म्हणाली. समोरच्या पैलवानाने यावर भरपूर हसून घेतले. आमचा हा प्रेमळ संवाद एका संस्कृतिरक्षक प्रवाशाने ऐकला तो काय बोलणार तेवढ्यात नायकाने त्याच्यासमोर पेपर धरला. पैलवानाने तिचा विजय झाला आणि माझा पराभव झाला हे अस्सल ग्रामीण शब्दात ऐकविले.

अखेर गाडी करमाळ्याला आली. गाडी वीस मिनिटे थांबणार आहे असे ड्रायव्हरने सांगितले. पैलवान मंडळीही उतरून गेली. नायकाने हॉटेलात जाऊन पूळ भरली. पान खाल्ले. एक इझान केळी घेऊन तो परत गाडीत आला. नायकाची सहप्रवासी पिशवीतून सुपारी काढून एकेक कण चिमटीने खात होती. नायकालाही सुरसुरी आली. तो परत खाली उतरला. सुपारी,चॉकलेट घेऊन आला. आणि आपल्या जागेवर बसला. नायकाच्या जागेवर ठेवलेला पेपर तिच्या बाजूला गेलेला होता. नायकाला वाटले एकटी असताना वाचायला घेतलेला असावा म्हणून त्याने तिला पेपर देवू केला. त्यावर तिने नकार दिला. लोक किती कोडगे असतात असा शेराही मारला. पेपरचा अंक खाली पडला होता.

ती नायकाचे उचलला. पाय पसरून झोपावे म्हणून सुटकेस तिच्याकडे सरकावली. तिने परत नायकाकडे सरकावली. तिने कंडक्टरला बोलावले. इतर प्रवासी नायकाला बोल लावू लागले. शेवटी कंडक्टरने ती सूटकेस शेवटच्या बाकड्याखाली सरकावून टाकली.

मग नायकाने दिवाळी अंक वाचण्यास सुरुवात केली. त्यातील विनोद वाचून नायक स्वतःच हसू लागला. मागच्या वारकऱ्याने अंक पाहण्यास मागितला. आता काय करावे असा प्रश्न नायकापुढे पडला व त्याने शेवटी चॉकलेट खाण्यास सुरुवात केली. गाडीने वेग घेतला होता. रस्ता कच्चा होता. धुळीचा व खाचखळगे असलेला होता. एक वळण असे आले की तिचा खिडकीवरचा हात निसटला व ती सरळ नायकाच्या मांडीवर डोके ठेवून पडली. ते वळण गेल्यावर नायकाकडे तिने अपराधी नजरेने पाहिले.

एव्हाना अकरा वाजले होते. ऊन कडक झाले होते. खिडकीतून त्याची किरणे तिच्या अंगावर पडत होती. ती नायकाकडे सरकायची. नायकाने पलीकडे सरकावे असे ती खुणेने सांगत होती. नायक कळून न कळल्यासारखा वागत होता. मागच्या वारकऱ्याने दिवाळी अंक परत केला आणि त्यांनी जेवणासाठी गाठोडे सोडले. नायकालाही भुकेची जाणीव झाली. त्याने केळी मांडीवर घेतली. एक केळ तोडून खाणार तोच शेजारचा एक मुलगा केळाकडे पाहतो आहे हे नायकाच्या लक्षात आले. मग त्याने त्या मुलाला तसेच आसपासच्या तीनचार लोकांना केळी दिली. व एक केळ सोलून नायक आरामात खात बसला. हे दृश्य एका म्हातारीने पाहिले. त्या पोरीला एक केळ दे असे तिने फर्मावले. नायकाने

केळ देण्याचा प्रयत्न केला तर ती तरुणी अधिकच भडकली. तिच्याकडे पैसे होते. तिला हवे असेल त्या वेळेला ती केळ घेवू शकणार होती. मुलींपुढे गोंडा घोळण्याची सवय मुलांना असते. या आशयाचे वाक्य तिने उच्चारले. नायकाने तोंड सांभाळून बोला असे ठणकावले. आणि तिच्याकडे तोंड फिरवून केळी संपविली. सुपारी खाल्ली. वारकऱ्यांना दिली. पण तेवढ्यात गचके देत गाडी थांबली. टाकीतून तेलाची धार लागली होती. गाडी पुढे जाणे शक्य नव्हते. मागून एखादी गाडी आल्यावरच नगरकडचा प्रवास सुरू होणार होता.

गाडीतले सगळे प्रवासी हादरून गेले होते. त्यांचे चेहरे बघण्यासारखे झाले होते. ड्रायव्हर विडी ओढू लागला. कंडक्टर खिशातून पेन्सिल काढून आकडेमोड करू लागला. लोकही गाडीतून खाली उतरले. रस्ताही विशेष रहदारीचा नव्हता, लोक टोळक्या-टोळक्याने मिळेल त्या सावलीखाली पसरले. नायकानेही सुटकेसमधला टॉवेल काढला, जमिनीवर पसरला. सुटकेसवर डोके ठेवून तो दिवाळी अंक वाचत बसला. सगळी गाडी खाली झाली होती. पण ती एकटीच गाडीत बसली होती. कंडक्टरने काही सांगताच ती खाली उतरली. सावलीसाठी नजरेने तिने अंदाज घेतला. पण एकही झाड रिकामे नव्हते. प्रत्येक झाडाखाली वारकऱ्यांनी पथाऱ्या पसरल्या होत्या. शेवटी ती नायकाकडे आली. ती आपणाकडे येत आहे हे पाहिल्यावर नायकाने तोंडावर अंक झाकून डोळे मिटले. आपल्याला गाढ झोप लागली आहे असे नायक दाखवत होता. मग तिने नायकाला हाका मारल्या. आता तिच्या बोलण्यात आक्रमकता नव्हती, ती नम्रपणे बोलत होती. नगरला गाडी रात्री नऊपर्यंत जाईल असे नायकाने म्हटल्यावर तिने रडका सूर काढला. दुपारचे

दोन वाजले होते. पण गाडी आली नव्हती. तिने वाचनासाठी पेपर मागितला. ती प्रवासामध्ये काही वेळापूर्वी जे जे बोलली होती ते ते नायकाने तिला ऐकविले. शेवटी नायकाने तिला एक दिवाळी अंक वाचावयास दिला. दूरवरची धूळ उडालेली पाहून एका प्रवाशाने गाडी आली, गाडी आली अशी आरोळी ठोकली. सगळे धडबडून जागे झाले तर तो एक खाजगी ट्रक निघाला. सगळ्या प्रवाशांनी आरोळी ठोकणाऱ्या प्रवाशाला शिव्या दिल्या.

ही सहप्रवासी तरुणी कंटाळली होती. चार वाजून गेले होते. तिने बरोबर काहीच आणले नव्हते. मग दोघांनी आडेवेढे घेत एकमेकांना टोमणे मारत केळी, चकली, लाडू संपविले. त्यानंतर मात्र या नायिकेने स्वतःच आपली हकीकत सांगितली. पंढरपूरला येण्याचे कारण नगरला राहण्याचे ठिकाण, कॉलेजमधील वर्ष असे सारे तिने सांगितले.

सहाच्या सुमाराला पंढरपूरहून एक एस्.टी. आली व कंडक्टरने टाळी वाजवून सर्वांना यायला सांगितले. तिची आता सहकार्याची भूमिका होती. नायकाचे सामान गोळा करण्यास तिने मदत केली. शेवटी ते गाडीत बसले. कंडक्टरने नायकाला मागे बसण्यास सांगितले, पण तिनेच आता हरकत घेतली. गाडी वेगात सुरु झाली. पोटात अन्न गेल्याने तिला पेंग आला. नायकाशी बडबडत असतानाच ती झोपी गेली. नायक फक्त विचारच करीत होता. रात्री दहा वाजता गाडी नगरला आली. नगर आले आता तुम्ही उठा असे म्हणून तिला उठवले. आणि नायकाने आपल्या खांद्यावर टेकलेलं तिचं डोकं अलगद उचलले व तिला जागे केले.

कथानकानंतर व्यक्तिचित्रणाचा विचार करावयाचा. कौटुंबिक भावबंध या आशयसूत्रात ज्या कथा येतात त्यापैकी 'पाळत' मध्ये

तात्या व भिक्या या पितापुत्रांचे भावबंध उलगडलेले आहेत तर 'बाबा गोष्ट सांगा' कथेत बंड्या व बबडी आपल्या वडिलांची खिल्ली उडवितात. तर 'हट्ट' या कथेत भुकेमुळे सदाची अवघडलेली अवस्था — त्याला धाड भूक लागली हेही सांगता येत नाही. तर 'एका दाताची कहाणी' मधला टिल्या हा कारण नसताना सासुरवाडीच्या लोकांच्या साक्षीने आपला एक दात गमावून बसतो. तसेच 'रजा' मध्ये तीन दिवस का होईना कौटुंबिक जिव्हाळ्याचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी आसुसलेल्या राजारामाला हिरमुसले होऊन परत जावे लागते.

या कौटुंबिक भावबंधात मुख्य पात्रांबरोबर इतरही अनेक व्यक्तिचित्रे भेटतात. या सर्व व्यक्तिचित्रांचा आता क्रमाने परामर्श घ्यावयाचा.

'पाळत' मध्ये मास्तर, भिक्या, तात्या, शिरपा व तारा कासारीण ही व्यक्तिचित्रे येतात. त्यातील मास्तर हे आपल्या विद्यार्थ्याला केवळ शालेय शिक्षणच देत नाहीत, तर शाळेबाहेरील ज्ञानही देतात. ते चौकस आहेत त्यामुळे भिक्याला ते प्रश्न विचारतात आणि तारा मावशी ही त्याची आईच आहे असे नवे ज्ञान देतात.

तसेच "...बघाच तात्याची पाळत सोडू नको"[६] असे ऐकवितात आणि भिक्याच्या मनात एक वादळ निर्माण करतात. खरे तर गुरुजी म्हणजे समाज मनाचा आरसा आहे. तात्याचे वागणे गैर आहे व तात्याला अद्दल घडली पाहिजे हाच विचार त्यांच्या उपदेशाच्या मुळाशी आहे. असे जाणवत राहते. भिक्या भाबडा आहे. गुरुजींवर त्याची श्रध्दा आहे. गुरुजी खोटे बोलणार नाहीत असे त्याला वाटते आणि घरी गेल्यावर तो तात्याची पाठ सोडत नाही. तो हट्टी आहे.

तात्याने आपणाला बाहेर जेवावयास जायचे आहे असे सांगितल्यावर आपणही तिकडे जेवायला येणार असे तो सांगतो. शेवटी त्याच्या हट्टापुढे तात्याला पड खावी लागते. भिकयाची बालबुध्दी खूपच तेज आहे. तात्याच्या प्रत्येक प्रश्नाला तो उत्तर देतो. त्याला लवकर झोपावयास सांगतो. पण आपणास झोप येत नाही असे म्हणतो. शाळेला सुट्टी असल्याने अभ्यास उद्याच करेन असे ठणकावून बोलतो. शिरपा नावाचा मित्र खेळावयास चलण्याविषयी विचारतो, त्यावेळी भिक्या त्याच्यावर डोळे वटारतो आणि आपण असल्या उन्हात खेळायला येणार नाही असे सांगतो. तो वडिलांपेक्षा सवाई आहे. वडील रागाने मागे लागल्यावर तो पळू लागतो. त्याच्या हाताला काही लागत नाही. त्याच्या ठिकाणी विलक्षण चिकाटी आहे. वडील देवळात भजन करू लागतात तर हा कितीतरी वेळ बाहेर ताटकळत राहतो. वडील त्याला हॉटेलमध्ये नेतात तर आज्ञाधारकपणे सगळे पदार्थ खातो. शेवटी झोपेचे सोंग घेतो. आणि तात्या तारा कासारणीकडे गेल्यानंतर त्या दोघांना पकडतो. असा हा भिक्या आपल्या इरसाल वडिलांना पुरून उरतो हेच खरे.

या कथेतील तात्या हे पात्र साळसूद आहे. आपली भिक्यावर किती माया आहे हे ते दाखवून देतात. आपल्या मुलाला रीत सांगण्याचा ते प्रयत्न करतात ज्या वेळेला एका व्यक्तीला जेवायला बोलावले असेल त्यावेळी दुस... जावू नये अशी रीत ते सांगतात. ते धोरणी आहेत. वेगवेगळ्या मार्गाने भिक्याला गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न ते करतात. अभ्यास, खेळ, हॉटेलात खाणे, घरी निवांत झोपणे असे अनेक मार्ग ते वापरतात. त्यांची कल्पनाशक्ती अचाट आहे. त्यांना वाटते महादेवाच्या देवळात आपण भजन करीत बसलो तर भिक्या

कंटाळून जाईल. ते तासभार भजन करतात पण काही उपयोग होत नाही. ते आपल्या इच्छेप्रमाणे आचार करणारे आहेत.

तारा कासारीण ही बिनधास्त स्त्री आहे. तिला गैरवर्तन करण्यात काहीच वाटत नाही. ती वाट बघून कंटाळली होती म्हणून "सकाळ पासून वाट बघातीया. कुटं मेला व्हता ?"[७] असे ती म्हणते. तिचे तात्यावर प्रेम आहे पण त्यांचा प्रणय भिकथा पूर्ण होवू देत नाही.

या कथेत शिरपा हे पात्र अगदी थोडा वेळ येऊन जाते. तो आज्ञाधारक आहे. तात्याचे म्हणणे तो ऐकतो. भिकथाने आपणाशी खेळावे असे ललगीने म्हणतो. भिकथाने रागावल्यावर तो सरळ चालायला लागतो. तात्या व भिकथा या दोघांच्या पाठशिवणीचा खेळ मात्र सतत आपणाला या कथेतून जाणवत राहतो.

'बाबा गोष्ट सांगा' ही कथा बाबा, आई, बंड्या, बबडी व रेगेबाई या व्यक्तिचित्रांच्या भावबंधातून उलगडत जाते. ही कथा तशी नागर आहे. यातून आपल्या डोळ्यांपुढे येते ते मध्यमवर्गीय कुटुंब. यातील कुटुंब प्रमुख बाबा यांनी गोष्ट सांगावी हा हट्ट त्यांची दोन्ही मुले करतात. हा असहाय्य पिता आहे. त्याला खरे तर शांतपणे चांदण्याचा आनंद घ्यावयाचा होता. पण त्याची ही दोन्ही मुले राहू, केतू या ग्रहासारखी त्याच्या पाठीमागे लागली होती. बाबांनी गोष्ट सांगितली व मुलांनी ती निमूटपणे ऐकली असे घडत नाही तर मुले या बाबाचा मामा करतात. ती अधिक शहाणी आहेत. त्यांना गोष्ट सांगायला लावली की आपणाला निवांतपणा मिळेल असे या बाबाला वाटते. पण छोटी गोष्ट व मोठी गोष्ट असे सांगून ही मुले त्यांना रडकुंडीला

आणतात. हे बाबा भाबडे आहेत. ते ऑफिसमध्ये रेगेबाईंना मदत करतात. खरे तर प्रत्येक पुरूष कर्मचारी अशी मदत करीत असतोच; पण हे घरी न बोलण्याचा शहाणपणाही करीत असतो. हे बाबा भाबडेपणाने सगळे सांगतात व त्याचा परिणाम म्हणजे बायकोकडून, मुलांकडून त्यांना मानहानी स्वीकारावी लागते.

मुलांच्या दृष्टीने बाबा म्हणजे खोळंबे आहेत. त्यामुळे बाबांना गोष्ट नीट सांगता येत नाही. मुलांच्या प्रश्नांची उत्तरे देता येत नाहीत आणि त्यांची फजिती होते. या घरात आईचीच चलती आहे. ती नव-याचा अजिबात आदर करीत नाही. ती संशयी आहे. रेगेबाईंविषयी तिच्या मनात संशय आहे. मुले जेव्हा "बाबा तुम्हाला जास्ती कोण आवडतं आपली आई का रेगेबाई ?" तर याचे उत्तर बाबांना नीट देता येत नाही. ती विलक्षण चिडखोर आहे. नव-याने शपथपूर्वक काही सांगण्याचा प्रयत्न केला तर कांगाव्याचा नायटा करते. नवरा आपली शपथ घेतो म्हणजे आपण मरावे असा अर्थ ती काढते. आणि वेळ पडली तर आपणच नव-याला मातीत घालू असेही म्हणते. अशी रांगीट स्वभावाची ती आहे.

या कथेतील बंड्या हे पात्र विलक्षण हुशार आहे. आपले वडील गोष्ट सांगण्याचे टाळतात हे तो पुरेपुर जाणून आहे. आणि तो त्यांना गोष्ट सांगण्यास प्रवृत्त करतो. त्याची स्मरणशक्ती तल्लख आहे. जेव्हा वडील उत्साहाने आपण वाघाची गोष्ट सांगणार असे म्हणतात त्यावेळी भीतीने बाबांचे सारे अंग ओले झाल्याचे स्मरण तो देतो. बंड्या वादविवादात कुशल आहे. वडिलांनी मोठी गोष्ट सांग असे त्याला फर्मावल्यावर धान्याचे कोठार व चिमणी यांची

कितीही दिवस चालणारी गोष्ट तो सांगू लागतो. बंड्या शंकेखोर आहे. राम,लक्ष्मण,सीता यांनी वल्कले परिधान केली व वल्कले म्हणजे जर झाडांच्या साली तर ती निसटली असतील ना अशी शंका तो व्यक्त करतो. थोडक्यात बंड्या हा आपल्या आईचा मुलगा शोभणारा आहे. वडिलांची खिल्ली उडविण्याची एकही संधी तो सोडत नाही.

या कथेतील दुसरे महत्त्वाचे पात्र म्हणजे बबडी. बंड्या व बबडी हे बहीण भाऊ एकमेकाला पूरक असेच आहेत. बबडी फटकळ आहे. आपले वडील कसे शब्द फिरवतात याची ती आठवण सांगते. आपली झोप लागली म्हणतात व काही वेळा पाहिले तर आईशी गप्पा मारत असलेले दिसतात. तिचे एकेक प्रश्न म्हणजे वडिलांवर हल्लाच असतो. ते गोष्ट सांगताना राज्य करणे म्हणजे काय? बाबांना तीन बायका करव्या का ? दशरथ राजा बाण कसा नेमका मारतो ? असे प्रश्न ती विचारते व त्यातून तिच्या बाबांचा पाणउताराच होतो. बबडी ही स्वत:चेच खरे करणारी आहे. दशरथाला एकही मुलगी नव्हती हे तिला पटत नाही. डिसमिस शब्दाचा ती वेगळाच अर्थ काढते. डिसमिस करणे म्हणजे कामावरून काढून टाकणे याऐवजी डिस नावाची मिस आहे असे ती बोलते. थोडक्यात ती बंड्याला साथ देणारी अशीच आहे.

या कथेत दोन तीनदा रेगेबाईंचा उल्लेख येतो. 'चिपाडासारखी दिसणारी, मुठीएवढा अंबाडा घालणारी व डोळ्यांना चापणं घालणारी तीच तुम्हाला आवडायची.'[१] असे हुंदके देत बंड्या व बबडीच्या आईने तिचे वर्णन केले आहे. या रेगेबाईविषयीची तक्रार या कथेतल्या आईने आपल्या सासूकडे केली आहे. बाबांना देखील रेगेबाईविषयी बाबांना सर्वजण जणू त्रासच देत असतात.

'हट्ट' या कथेत तारामती, सदा, गावचे पाटील आणि नातलग येतात. हा कथासंग्रह जरी विनोदी असला तरी 'हट्ट' ही कथा विनोदी नाही. राणूच्या मृत्यूनंतर त्या घरावर जो दुःखद प्रसंग ओढवला त्याचे चित्रण या कथेत आहे.

तारामती ही राणूची बायको. तिच्यावर दुःखाचा जणू डोंगरच कोसळला होता. आपल्या मुलाचे, सदाचे कसे होईल याचेच दुःख तिला वाटत होते. बटान नावाच्या गावाहून तिची मुलगी आली. जावई, विहीण, व्याही आले. परत रडण्याचा हल्लकल्लोळ उठला. या सगळ्या प्रसंगात तारामती समजूतदारपणे वागत होती. व्यवहार पाळत होती. स्मशानातून माणसे घरी आल्यावर सदाला जवळ घेऊन तारामती रडू लागली. बायका आल्यावर नवऱ्याचे कष्ट, त्याग, प्रेम, सचोटीपणा ती सांगत होती. नवऱ्याविषयीचा उत्कट प्रेमभाव तिच्या बोलण्यातून व्यक्त होत होता. सदाला अनेक प्रश्न विचारले; पण सदाचे रडणे काही थांबेना. शेवटी सदाला भाकरी हवी हे उत्तर मिळाले. सामान्यपणे जीवनात विशेषतः स्त्रीला आलेला प्रत्येक प्रसंग मग तो सुखाचा असो वा दुःखाचा तिला तो साजरा करावा लागतो. याचे दर्शन तारामतीच्या व्यक्तिरेखेतून घडते.

या कथेतील दुसरे पात्र म्हणजे सदा. आपल्या वडिलांच्या मृत्यूने तो बावरलेला आहे. लहान मुलांच्या अनुकरण प्रवृत्तीप्रमाणे तो वागतो. लोक सांगतील तसे तो वागतो. तो भांबावलेला आहे; पण प्रामाणिक आहे. नर्मदेची सासू काय अथवा आपली आई काय यांच्या बोलण्याचा त्याचे रडे थांबण्यास उपयोग होत नाही. खरे तर त्याला भूक लागलेली असते.

यातील तिसरे पात्र म्हणजे हरिबा पाटील.या प्रसंगातून मार्ग काढला पाहिजे ही त्यांची भूमिका आहे. त्यामुळे ते पटकन कामाला लागतात. ते प्रत्येकाला कामे सांगतात. त्यांच्या मते लवकर अंत्यविधी करायचा असतो. पण दगडू भोसल्याने व्यवहार सांगितलेला असतो. बटनात दिलेल्या नर्मदेला बोलावणे आवश्यक असते. पाटील मुरग्याला त्या गावी पाठवतात. ते शांत स्वभावाचे आहेत. नर्मदा व तिच्या घरचे लोक आल्यावर अंत्यविधी आटोपतात असे ते व्यवहारी आहेत.

या कथेत नर्मदा, मुरग्या, नर्मदेची सासू, नवरा; सासरा अशी काही पात्रे येतात. गावातील स्त्री-पुरूषही येतात. एखाद्या प्रसंगात दोन तीन वाक्यात त्यांचे दर्शन आपल्याला घडते. ही सगळी पात्रे सदा व तारामतीचे दुःख कमी करण्याचा प्रयत्न करतात. असे जाणवते.

या आशयसूत्रातील पुढची कथा 'एका दाताची कहाणी' ही आहे. त्यात टिल्या, त्याची पत्नी, सासू, सासरे, डॉक्टर ही पात्रे येतात. यातील मुख्य पात्र म्हणजे टिल्या. तो पहिल्या दिवाळसणाला सासरी आलेला. सासुरवाडीचा पाहुणचार घ्यायचा व जमेल तेवढे लुटून आणायचे या हौसेने तो सासरवाडीला येतो. सासूने कौतुकाने फराळाचे ताट पुढे ठेवलेले. त्यातील पदार्थांशी झटापट करताना त्याचा दातच मुळापासून हालतो आणि त्याच्या डोळ्यात पाणी येते. सासुरवाडीला असताना फजिती झाली तर त्यासारखे दुसरे दुःख नाही. डॉक्टरांच्या उपचाराने त्याची प्रकृती अधिकच बिघडते. पुढे तो असा दुर्दैवी की डॉक्टर त्याचा हलणारा दात काढण्याऐवजी दुसराच दात काढू लागतात. त्याच्या तीव्र वेदना त्याला सोसाव्या लागतात. तो सोशिक आहे. सासुरवाडीत टिल्याची झालेली फजिती हीच या कथेतून दिसते.

यानंतर टिल्याच्या सासू सास-यांचे जावयाविषयीचे उत्कट प्रेम आपणाला दिसते. ते स्वाभाविक आहे.म्हणून त्यांनी त्यांच्या दृष्टीने उत्तम पदार्थ केलेले असतात. आपले जावई आळीपाळीने पदार्थ खात आहेत म्हणजे ते भलतेच चविष्ट आहेत असे त्यांना वाटते. पण टिल्याने हातातला लाडू क्रिकेटच्या चेंडूप्रमाणे फेकला व त्याचा प्रसाद नेमका सासूबाईच्या पायाला मिळाला. तो पाय सुजून टम्म झाला. पुढे त्यांना जावयाच्या तब्येतीची उस्तवारी करावी लागली. सासूबाई या अशा तर सासरे मात्र पूर्वग्रह घेऊन बसलेले. म्हातून ते जावयावर चिडलेले. कारण 'माझी पोरगी गिळ्ळ्याच्या गिळून परत आला मला गिळायला अन् माझं गिळायला.'[१०] असे त्यांना वाटते. हे सासरेबुवा व्यवहारी आहेत. सोशीक आहेत. आपल्या पत्नीच्या पाककौशल्याने त्यांना जावयाची सेवा करणे भाग आहे. टिल्या त्यांचे कौतुकही करतो, पण सासरेबुवांची फारच धावपळ झालेली दिसते.

या कथेतील डॉक्टर खरे तर टिल्याच्या जखमेवर मीठ चोळतात. त्याचा चांगला दात हालवतात. या कथेत सासरवाडीची मेहुणे मंडळी टिल्याच्या अंगाला कधी झोंबणारी तर कधी त्याच्यापासून दहा फूट अंतर राखणारी दिसतात आणि टिल्याचे दाताचे दुखणे अधिक विनोदी पातळीवर जाते.

या कथासंग्रहाचे दुसरे आशयसूत्र शहाणपणाचे दर्शन हे आहे यात 'करामत,' 'अग अग म्हशी,' 'वसूली' व 'सोबत' या कथांचा समावेश होतो. करामत कथेतली किष्णा कष्टाळू आहे. दुर्दैवाने विधवा आहे. कामाशी गाठ घालणे ही तिची वृत्ती आहे. त्यामुळे स्वयंपाकासाठी काटक्या गोळा करताना तिला वेळेचे भान राहत नाही व अंधार

पडल्यावर ती घरी येण्यास निघते. तिच्या ठिकाणी स्त्रीसुलभ भीती आहे. अंधारात जात असताना आपल्यामागून कोणीतरी येते आहे असे तिला वाटते. शेवटी धीर करून ती नाव विचारते आणि मग ती गावातल्या नामूतात्याचा दामू आहे हे तिच्या लक्षात येते. तो सरळ आपल्या प्रेमाची कैफियत मांडतो. खेड्यामध्ये विधवा बाई म्हणजे गावातील भानगडीखोर लोकांना आपली मालमत्ताच वाटत असते; पण किष्णा बोलण्यास प्रवृत्त करते. त्याच्याशी गोड गोड बोलते आणि कोंडीबा पाटलाच्या गावकारातील विहिरीच्या समोरच्या झुडपाजवळ आपण भेटू असे सांगते. आणि सासूला पाठवून दामूला चांगली अद्दल घडविते.

दामू हे या कथेतले महत्त्वाचे पात्र. तो वरवर विचार करणारा आहे. गोड बोलून आपण किष्णासारख्या स्त्रीला वश करू असे त्याला वाटते. तो वरवरच्या बोलण्याला भुलणारा आहे. तो सखोल विचार करीत नाही. स्वप्नाळू आहे. किष्णा आता आपली झाली असे त्याला वाटते. तो शेवटी खजील होतो. किष्णाच्या म्हाताऱ्या सासूचे जोडे खातो.

या कथेतील म्हातारी सासू प्रेमळ आहे. सुनेला तिचा व तिला सुनेचा आधार आहे. प्रांजळपणे आपल्या सुनेने जी हकिकत सांगितली व आपली सुटका करून घेतली त्यावर तिचा विश्वास आहे. तो विलक्षण संयमी आहे. नाटकी आहे. दामूला ती बरोबर जाळ्यात पकडते व चोप देते.

केसूतात्या हे या कथेतले पात्र म्हणजे समाजाचे प्रतिबिंब आहे. केसूतात्या काय अथवा इतर त्यांच्यासारखे लोक काय त्यांच्यापुढे दामूने

गप्पा मारलेल्या असतात आणि दामू पराभूत होवून कसा आला हेच ते " आन् इतक्या लवकर कसा रं आलास, काम झालं न्हवं तुझं ? ?? या प्रश्नातून दामूचा पाण उताराच केला जातो. थोडक्यात, या कथेतली पात्रो वास्तवाच्या भूमीवरच उभी आहेत असे वाटते.

या शहाणपणाचे वेगळे रूप 'अग अग म्हशी' या कथेतून आविष्कृत झाले आहे. या कथेत नारायण, रखमा व आई ही तीन पात्रो आहेत. यातील नारायण हा धोरणी आहे. गावात इंग्रजी बोलणारा तो एकटाच मुलगा आहे. कलेक्टर इतके शिक्षण घेतलेला असे इंप्रेशन त्याने मारलेले आहे. म्हातारी, शेजारच्या बायका यांनी लग्नाचा विषय काढल्यावर तो उदासपणे उत्तरे देतो. विलक्षण थंडपणा दाखवतो. आपली बहीण रखमा हिला आपल्या बाजूला करून घेतो. त्याला आपल्या आईचे मानसशास्त्रा बरोबर कळते. आपण शिकलेले आहोत त्यामुळे आपल्याला शिकलेली बायको हवी हे त्यांना पटवून देतो. काही वेळा सूचकपणे बोलून तर कधी गप्प बसून तो बहिणीला बोलते करण्याचा प्रयत्न करतो व त्यांच्याच तोंडून शिकलेली मुलगी कशी योग्य आहे हे वदवून घेतो. नटयांच्या फोटोत आपल्या प्रेयसीचा फोटो मिसळतो व हीच मुलगी कशी चांगली हे तो पटवून देतो. रखमा हे या कथेतले महत्त्वाचे पात्रा. ती समन्वयक आहे. आपला भाऊ व आई यांच्यात ताळमेळ घालण्याचा ती प्रयत्न करते. ती नव्या पिढीची - त्यामुळे आपल्या भावाचे मन जाणून घेणे तिला सुलभ जाते व भावाच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यास ती अप्रत्यक्षरीत्या मदत करते. हरीबा, शेजारची पुतळा मावशी ही पात्रो कथानकाला पूरक अशी आहेत.

या आशयसूत्रातील पुढील कथा वसुली ही आहे. गणपा पाटील, सदा सुतार, बाबू न्हावी, गणपाची पत्नी व मुले, सदाची पत्नी व मुले एवढी व्यक्तिचित्रे या कथेत भेटतात. या कथेतील गणपा पाटील,याला आपण फसविले गेल्याचे मोठे दुःख असते. सदा सुताराने त्याच्याकडून पन्नास रुपये नेलेले असतात; पण मुद्दल अथवा व्याज यातील एक पैसाही मिळालेला नसतो. बाबू न्हाव्याच्या बोलण्याने त्याचा राग वाढतो. तो गणपा पाटलाला भडकवितो. मुद्दल सोडून आपण रोख पन्नास रुपये देणार असे तो सदाला सांगतो. त्याची गाय आपल्या दावणीला आणून बांधतो. आपण सदाला गंडविले असे गणपा पाटलाला वाटते. गायीपासून मिळणा-या उत्पन्नाची तो स्वप्ने पाहतो . पुढे त्याच्या वाट्याला असहाय्यता येते. त्याला गाय धार देत नाही. तेव्हा पराभव पत्करून तो सदा सुताराला गाय घेवून जाण्यास सांगतो.

या कथेतील सदा सुतार परिस्थितीने नाडलेला आहे. सगळी सोंगे करता येतात पण पैशाचे सोंग करता येत नाही हेच खरे. पुढे जेव्हा गायीची धार काढण्यास पाटील बोलवतो तेव्हा तो तेथे चांगलाच रमतो. त्याची मुले व तो जेवण,दूध,ताक यांच्यावर यथेच्छ ताव मारतात. पुढे त्याची बायकोही येते, शेवटी गाय त्याच्या पदरात पडते.

बाब्या न्हावी हे या कथेतले पात्र प्रतिनिधिक आहे. खेड्यामध्ये असे एखादे पात्र असतेच. भांडणे लावणे हा त्याचा मूळ स्वभाव आहे.

गणापा पाटलाची बायको धोरणी आहे. आपण खूप व्यवहारी आहोत असे त्या दोघांना वाटते. गायीने नव-याची केलेली फजिती पाहून तोंडाला पदर लावून फिदीफिदी हसणारी ही बाई गायीच्या लाथेने पार जायबंदी होते. तीच सदाला धार काढण्यासाठी बोलावण्याचे सुचविते. त्यानंतर त्याच्या कुटुंबाची उस्तवारी करताना मेटाकुटीस येते. याउलट सदाची मुले बायको बिनधास्त आहेत. गणापा पाटलाच्या घरी ती चांगलाच पाहुणचार घेतात व गणापा पाटलाला रडकुंडीस आणतात.

ब्राह्मणपणाचे दर्शन या आशयसूत्रात 'सोबत' ही कथा आहे. या कथेचा निवेदक हा साक्षीदार आहे. तो या निवेदकाचा प्रवासातील सोबती. तो दिसायला साधासुधाच होता. त्याचे वर्णन असे येते,
"मळकी चुरगाळलेली पॅन्ट त्याने घातली होती. मॅनेलाही तसाच होता. केस मात्र चापून चोपून बसविलेले होते. गळ्यात काळा दोरा घातलेला होता. ओठावर मिशीची बारीक रेघ ठेवलेली होती. अवतारावरून स्वारी अशी तशीच वाटत होती." [१२] असा हा प्रवासातला सोबती अगत्याने वागत होता. निवेदकाना पेपर करत करताना तो अतिशय नम्रतापूर्वक परत करत होता. दोस्ती वाढविण्याची त्याची वृत्ती होती. जयसिंगपूरला गाडी थांबल्यावर त्याने शेंगदाण्याच्या दोन पुड्या घेतल्या होत्या. त्यातील एक निवेदकाला दिली होती.

नातेवाईकांच्या संबंधाचा खुबीने वापर करण्याची त्याची वृत्ती होती. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु आप्पासाहेब पवार त्यांच्याशी त्याच्या सास-याचा परिचय होता. त्याचे कपडे व बोलणे यांच्यातील तफावत कोणाच्याही लक्षात येण्यासारखी होती. त्याचे त्याला

भान होते. पण आपले सासरे साधी राहणी महत्त्वाची मानतात हे त्याने आवर्जून सांगितले. आपणाकडे गाडी आहे हेही तो सांगतो. दुस-यावर छाप टाकण्याची कला त्याला चांगलीच अवगत होती. हार्डवेअरचा धंदा व प्लॅस्टिकच्या कारखाना काढण्याच्या गोष्टी तो करतो. त्याने बघाता बघाता शेजारच्या म्हातारीवरही छाप टाकलेली दिसते. आपल्या नातवाला नोकरी लावावी असे ती म्हणते.

हातकणंगले स्टॅन्डवर निवेदक व हा सोबती या दोघांनी एकत्र चहा घेतला. चहाचे पैसेही या सोबत्याने दिले. कोल्हापूरला उतरल्यावर आपल्या सास-याकडे चलण्याचा त्याने आग्रहही केला. त्याच्या सगळ्या वागण्यात एक प्रकारचा उत्साह होता. अगत्य होते. हा सोबती विलक्षण प्रांजळ आहे. निवेदकाचा निरोप घेताना त्याने सरळ सांगितले की, आतापर्यंत तो जे बोलला ते सगळे खोटे होते. सांगली स्टेशनात आलेपाक विकणारे आपण सामान्य व्यक्ती आहोत असे सांगून आलेपाकाची वही निवेदकाच्या हातात देवून तो निघून गेला.

या कथेतले दुसरे पात्र निवेदक आहे.तो प्राध्यापक आहे. एस्.टी. —ने कोल्हापूरला विद्यापीठ बैठकीसाठी निघालेला आहे. हा निवेदक मनमिळावू. आपल्या सोबत्याबरोबर तो गप्पा मारतो आणि शेवटी देखील त्या सोबत्याला गर्दीत शोधण्याचा प्रयत्न करतो. या कथेतील तिसरे पात्र म्हणजे निवेदकाच्या शेजारी बसलेली म्हातारी, तीही या सोबत्याच्या बोलण्यात ओढली जाते. कारखा विद्यार्थीच्या त्याच्या बोलण्याने तिच्या आशा पल्लवीत होतात . आपल्या नातवाला कोठेतरी नोकरी मिळावी असे तिला वाटते.

या कथासंग्रहातील मोठेपणाच्या हौसेचे चित्रण या आशय—

सूत्रात 'मी भाषणाला जातो,' 'लाल त्रिकोण,' 'सोबत' या कथांचा समावेश होतो. 'मी भाषणाला जातो' या कथेत नायक त्याची पत्नी आणि वत्सलाबाई व इतर मंडळी आहेत. यातला नायक आहे तो प्रोफेसर असून देखील भाषणे देत नाही; पण पत्नीच्या सततच्या बोलण्याने भाषण देण्यास तो अखेरीस तयार होतो. तो विलक्षण उत्साही व कष्टाळू आहे. भाषणाची तयारी करण्यासाठी तो खूप प्रयत्न करतो. चाळीतील सभा त्याने गाजवल्या होत्या. त्याने गणपती उत्सवात शाळांना पत्रे देखील लिहिली व त्यांना आरडगांव खुर्दचे आमंत्रण मिळाले. या नायकाची बिकट अवस्था झाली आहे. तो चौकस आहे. त्यामुळेच तरडगावची गाडी तो पकडतो कारण तेथून आरडगाव जवळ असते. तो खूप प्रयत्नवादी आहे. पण नशीब काही त्याला साथ देत नाही. तो सायकल मिळवून आरडगावी जाण्यास निघतो. अनेक अडचणींवर मात करतो. ही सायकल नायकाला खड्ड्यात पाडते. शेवटी ते भाषणाचे आरडगाव नसतेच.

या कथेत नायकाची पत्नी, वत्सलाबाई, रमाबाई, सौ. पोटफोडे, पांडबा गवळी, शेजारची कुत्री, गणोबा अशी पात्रे अगदी सहज एकदोन प्रसंगांच्या निमित्ताने येतात. ही सगळी पात्रे नायकाच्या भाषणबाजीला या ना त्या प्रकारे मदत करीत असतात. या पात्रां-बरोबर छोटूकाका, देशमुखीण बाई ही पात्रेही आहेत.

या आशयसूत्रातील 'लाल त्रिकोण' ही पुढील कथा. समाज-सुधारक बनण्याच्या हौसेचे झालेले हसे या कथेत पाहायला मिळते. कुटुंबनियोजनाचा प्रसार करण्यासाठी वत्सलाकाकू, भुजाभाऊ, नायक ही मंडळी जातात. यातील भुजाभाऊ हे पात्र अती उत्साही आहे.

सुरुवातीला भजनीमंडळात गेल्यावर तेथील दोनशे स्त्रियांपैकी एकीने 'आमच्या सर्वांची वये साठाच्या आसपास आहेत.'[१३] असे सांगूनही देशाच्या कल्याणासाठी कुटुंब नियोजन केले पाहिजे असा मंत्र भुजाभाऊ देतात. भुजाभाऊ विलक्षण चिकाटीचे गृहस्थ आहेत. खेड्यातील लोकांना कुटुंबनियोजनाचे महत्त्व ते पटवून देतात. कोणी त्यांना तमासगीर म्हटले तरी त्यांना त्याचा राग येत नाही. ते आपले कार्य पुढे तसेच चालू ठेवतात. एखादा प्रश्न, समाजाचा त्याविषयीचा दृष्टीकोण, प्रश्न मांडण्याची पध्दत, वेळ या सगळ्यांचा नीट मेळ न घातल्यामुळे भुजाभाऊंची फजिती होते.

वत्सलाकाकू भुजाभाऊंच्या सख्ख्या भगिनीच आहेत. त्याही या कार्यात पुढे आहेत. शाळेमधील मुलांना कुटुंबनियोजनाचे महत्त्व त्या पटवून देवू लागतात. त्यांच्या एकेका प्रश्नाला मासलेवाईक उत्तर येते. परीक्षेत किती मार्कांचा प्रश्न, आपल्याकडे लाल त्रिकोणाची वीस चित्रे आहेत असे कधी प्रतिप्रश्न तर कधी जादा माहिती मुले देतात. त्या मुलांना कसे बोलावे ते कळत नाही. आणि बाईंना चक्कर आल्याची स्थिती अनुभवावी लागते. एका मुलाने तर कुटुंबनियोजनाचे साहित्यच मागितले व वत्सलाकाकूंना पश्चाताप करण्याची वेळ या मोहिमेने जणू आणली. चिंतोपंत, नायक, मराठी शाळेचे मास्तर ही मंडळी हीही या कार्यक्रमात सहभागी होताना दिसतात.

यानंतरच्या 'सोबत' या कथेत नायकाला प्रवासात आलेला एक अनुभव आहे. पंढरपूर स्टॅन्डवरून बस सुटते. शेजारी एक सुंदर युवती बसलेली असते. नायक तिच्याशी सलगीने वागण्याचा प्रयत्न करतो. पण ती तरुणी भलतीच ताठरपणे वागते, वेळ पडल्यावर ती नमते घेते.

एस्.टी.मध्येच बंद पडते. नाइलाज झाल्यावर ती नायकाशी बोलण्याचा प्रयत्न करते. नायकाचा दिवाळी अंक वाचण्यास घेते. भूक लागल्याचे आडवळणाने का होईना सांगते. नायकाच्या फराळावर यथेच्छ ताव मारते व शेवटी विश्वासाने नायकाच्या खांद्यावर डोके ठेवून झोपी जाते.

या कथेतला नायक रोमँटिक वृत्तीचा आहे. तो शेजारी बसलेल्या तरुणीवर छाप पडण्याचा प्रयत्न करतो. त्याला आपल्या मर्यादांची जाणीव आहे. पैलवानांनी त्याचा उपमर्द केला तरी तो तिकडे दुर्लक्ष करतो. ती तरुणी शरण आल्यावर तो सर्व सहकार्य करतो. पण तिची वाक्ये तिच्या गळीही उतरवतो. तो हुशार आहे. जीवनाकडे तो मिस्किल दृष्टीने पाहतो.

या कथेत नायकाला हसणारे पैलवान आहेत. नायक व ती तरुणी यांचे भांडण मिटावे म्हणून शेवटच्या सीटखाली नायकाची सूटकेस ठेवणारा कंडक्टर आहे. भांडणावर वेगवेगळी प्रतिक्रिया व्यक्त करणारे वारकरी आहेत. कमरेवर हात ठेवून विठ्ठलाप्रमाणे उभा असलेला, गाडी आली गाडी आली असे म्हणत ओरडणारा व ती बस नसल्याने वारकऱ्यांच्या शिव्या खाणारा एक वारकरी आहे. ही समूहचित्रे नायक नायिकेच्या व्यक्तीचित्रांना अधिक उठाव देतात.

व्यक्तीचित्रणानंतर मनोविश्लेषण या घटकाचा विचार करणे ओघानेच येते. 'पाळत' या कथेत गुरुजींनी भिकाला जे नवे ज्ञान दिले त्यातून त्याचे कुतुहल जागृत होते. आपणाला पाचवी व सहावी असे दोन वर्ग शिकविणारे गुरुजी खोटे कसे बोलतील असे भिकाला वाटते. त्याच्या मनाचे कुतुहल आणि त्याला टाकून ताराकडे जाण्यासाठी

ओढ घेणारे तात्यांचे मत याचे दर्शन या कथेत घडते. ही दोन्ही पात्रे जसे वागतात, ज्या युक्त्या करतात त्यातून त्यांच्या मनाचे दर्शन घडते. येथे कौटुंबिक भावबंध असे संघर्षमय रूप धारण करतो तर 'बाबा गोष्ट सांगा' या कथेत कुटुंबातील प्रत्येकजण कुटुंबप्रमुखाला या ना त्या प्रकारे त्रास देतो. मुलांना करमणूक हवी असते. बायकोला कधी प्रेम व्यक्त करायचे असते तर कधी तिला रेगेबाईचा मत्सर वाटतो. तर कधी नवऱ्यावर अधिकार गाजवायचा असतो. यासाठी कधी राग तर कधी रडणे अशा शस्त्रांचा ती वापर करते. आपल्या वडिलां-विषयी मुलांच्या मनात अनेक प्रश्न येतात. वडिलांचा भित्रेपणा, त्यांनी तीन बायका केल्या तर काय होईल या सगळ्यांतून बाल मनाचे दर्शन घडते. तर 'हट्ट' कथेत वडिलांच्या आकस्मिक मृत्यूने सदा बावचळून जातो. या प्रसंगी कसे वागावे हेही त्याला कळत नाही. तो केवळ अनुकरण करतो. आज्ञाधारकपणे सगळ्या गोष्टी करतो. पण या प्रसंगी आपल्याला भूक लागली आहे, हे कसे सांगायचे हे त्याला कळत नाही. त्याच्या मनाची उलघाल होते. आणि केवळ रडण्याने तो ती प्रकट करतो. त्या रडण्यामुळे तो इतर पात्रांचे लक्ष वेधून घेतो. आणि त्याला आपले म्हणणे मांडता येते.

कौटुंबिक भावबंध हे कधी सरळ असतात तर कधी <u>नाट्यमय</u> असतात. 'एका दाताची कहाणी' मध्ये टिल्याला सासुरवाडीचा पाहुणचार घ्यायचा असतो. सासूसासऱ्यांनाही त्याचे कौतुक करायचे असते; पण सासूच्या पाककौशल्याने सगळा घोटाळा होतो. एका बाजूला कौतुक करणारे सासूसासरे असतात तर दुसऱ्या बाजूला वेदनांचे दुःख सोसणारा टिल्या असतो. सासुरवाडीची माणसे कसोशीने पथ्य पाळण्याचा प्रयत्न

करतात आणि टिल्याचा आजार वाढतो.

तर 'रजा' या कथेत राजारामची शारीरिक व मानसिक उपासमार होते. आठ दिवसांच्या रजेपैकी पाच दिवस प्रवासात जाणार असतात ; उरलेल्या तीन दिवसांपैकी बराच वेळ हा गावातल्या लोकांच्या व मेहुणा, सासरा यांच्या सहवासात जातो. त्याच्या निरोप घेतानाच्या हसण्या-पाठीमागचे अश्रूच लक्षात राहतात.

शहाणपणाचे दर्शन या आशयसूत्रातील 'करामत' या कथेतील किष्णा दामूच्या वर्तनाचा अंदाज घेते. त्याच्या रोमँटिकपणाला ती टोलवत राहते. सासूच्या व्यवहारीपणाचा उपयोग करून घेते आणि या शहाणपणाच्या साह्याने आपल्यावर आलेले संकट ती परतवून लावते. 'अग अग म्हशी' या कथेत नारायणाच्या आईची तगमग चाललेली असते. मोठेमोठे पाहुणे उंबरठे झिजवत असतात. आणि लग्नाच्या विषयाला नारायण काहीच प्रतिसाद देत नाही. त्यामुळे तिच्या मनाची नुसती उलघाल होते. तुलनेने रकमा शांत आहे. ती आपल्या भावाच्या मनाचा अंदाज घेते आणि नारायण अशी प्रश्नांची पेरणी करतो की त्यातून त्याला हवे ते मिळते. त्याचे चातुर्यच यातून प्रकट होते.

'वसुली' या कथेत गणपा पाटलापेक्षा सदाचे चातुर्यच वरचढ ठरते. सदा आपले पैसे लवकर देणार नाही यामुळे चिडलेला गणपा पाटील सदाची व्यायला झालेली गाय आपल्या घरी घेवून जातो. तो व त्याची पत्नी खुषीत असतात. कालवड झाल्यावर त्यांचा आनंद थोडासा उतरतो पण दुधाचे पैसे आपणाला मिळतील असे त्यांना वाटते. दोघेही पतीपत्नी स्वतःच्या शहाणपणावर खूष असतात. पण धार काढण्यासाठी सदाला बोलवावे लागते. थोडे दिवस आनंदात जातात.

पण जेव्हा सदा व त्याचे कुटुंबीय यांना पोसण्याची त्यांच्यावर वेळ येते तेव्हा सदाचे कर्ज माफ करून त्याची गाय त्याला परत करतात. माणसाचे अंदाज नेहमीच बरोबर ठरतात असे नाही. परिस्थितीच्या चक्रात माणूस अडकला की त्याचे काय होते हे या कथेतून लक्षात येते. तर 'सोबत' या कथेत आलेपाक विकणारा माणूस काही काळ तरी मोठ्या ऐटीत राहतो. सहप्रवासी असणाऱ्या एका प्राध्यापकाला व आजीबाईला मंत्रमुग्ध करतो. ही सगळी ऐट मिरविणारे मन तितकेच प्रांजळ आहे. शेवटी आपण एक आलेपाक विक्रेते आहोत असे तो बोलतो. एकाच मनामध्ये मोठेपणाची हौसही आहे व दुसऱ्याला आपण फसवू नये.आपले खरे रूप काय ते सांगावे अशी ओढही आहे.

मोठेपणाच्या हौसेचे चित्रण या आशयसूत्रात मी भाषणाला जातो ही कथा येते. आसपासचे सगळे लोक भाषणे देतात, गाजवतात, पण आपला नवरा प्राध्यापक असून भाषण देत नाही. तो मुखदुर्बळ आहे हे नायकाच्या पत्नीला डाचत असते. म्हणून नायकाची पत्नी नायकाला प्रेरणा देते. त्यातूनच पुढे हा नायक भाषणाला जातो. आरडगावच्या व्यासपीठापर्यंत जाणेही त्याला जमत नाही. त्याची फजिती होते. पण या साऱ्यातूनच त्याची भाषणाची जिद्द व्यक्त होते. 'लाल त्रिकोण' या कथेतील भुजाभाऊ व वत्सलाबाई यांच्या मनातील समाजसुधारणेची हौस फिटते. एखाद्या प्रश्नाकडे शहरी माणसाचा बघण्याचा दृष्टीकोण व ग्रामीण माणसाचा दृष्टीकोण यात केवढा फरक असतो याचे दर्शन या कथेत घडते. ही दोन्ही मने किती भिन्न पातळीवरून विचार करतात हे लक्षात येते. तर 'सोबत' कथेत शहरी शिष्टपणा गाजविणारी एस्.टी.तील तरुणी शेवटी

नायकाला कशी शरण येते. परिस्थाती, पोटाची भूक यामुळे ती गरीब गाय कशी बनते हे लक्षात येते. पती पत्नी, पितापुत्र, जावई-सासू, शेजारी- शेजारी अशी कितीतरी वेगवेगळी नाती या कथांतून उलगडत जातात. त्या त्या पात्रांच्या मनाची क्षणोक्षणी पालटणारी रूपे रसिकांचे मन वेधून घेतात हेच खरे.

यानंतर या कथांतील विनोदाचा विचार करावयाचा. शब्दनिष्ठ, प्रसंगनिष्ठ असे विनोदाचे स्थूलमानाने प्रकार पडतात. या कथेतला विनोद आशयाशी एकरूप झालेला आहे. त्याची काही उदाहरणे पाहावयाची आहेत. 'पाळत' या कथेत भिकूयाच्या पाठीमागे तात्या लागलेला आहे. हॉटेलात जाऊन पाणी प्यावे असा त्या दोघांचा समझोता होतो तेव्हा भिकूया म्हणतो, "धोतर फाटलं बघा मागं, फाटू दे हित. फिटायची वेळ आलीया माजी." १४ फाटणे व फिटणे या दोन्ही शब्दांमुळे शब्दनिष्ठ विनोद होतो. तात्याच्या पाठीमागे ज्या पद्धतीने भिकूया लागला आहे ते पाहिले की वरील शब्दांतून तात्याने आपली प्रकट केलेली अवस्था वाचकाला मनोमन पटते. अशीच फजिती टिल्याची सासुरवाडीला झालेली असते. सासुरवाडीचे खाणे, बिघडलेली प्रकृती यामुळे टिल्याला गॅस झालेले असतात. "त्याच्याजवळ सासरे गेले तर होणाऱ्या आवाजाने ते लटालटा कापू लागले. शिवाय मुलांना दिवाळसणात विनोदी मासिकांपेक्षाही खमंग व चांगले विनोद विषय मिळाल्याने त्यांची पोटभर करमणूक झाली." १५ विनोदी मासिक व विनोद विषय झालेला टिल्या या दोघांच्या तुलनेने या विनोदाची खुमारी वाढते.

कधी अभिप्राय विचारण्यातून हा शब्दनिष्ठ विनोद फुलतो.

'अग अग म्हशी' या कथेत नारायण आईला काही फोटो दाखवितो. यातील तिसरा फोटो हातात घेताच ती म्हणते. "हिचं काय होळं हायतं का किडलेले मिरे ? मिच-मिच्या डोळ्याची नगं ग बया आसली पोर." [१६] हे वाचल्यावर नारायणाच्या आईच्या या अभिप्रायापेक्षा ते फोटो दाखवून नारायणाने आपल्या आईच्या डोळ्यांत कशी धूळ फेकली आहे हे आठवते व त्याचे आपल्याला हसू येते. तर मी भाषणाला जातो या कथेत आपले भाषण दूधवालीला म्हणून दाखवावे आणि सामान्य माणसाचा अभिप्राय घ्यावा असे नायकास वाटते पण त्याच्या भाषणावर बायकोकडे दुसऱ्या दिवशी ती दूधवाली प्रतिक्रिया व्यक्त करते ती अशी "– मास्तर अलिकडं येड्यावानी बरळत्यात जणू. एकदा ठाण्याला तरी घेऊन जावा. येळच्या येळीं बघितलेलं बरं असतं." [१७] या प्रतिक्रियेतील ठाण्याला हा शब्द रसिकांच्या चेहऱ्यावर हास्य उमटवितो. ठाण्याला असलेल्या वेड्याच्या इस्पितळाची सहज आठवण करुन देतो. तर 'सोबत' कथेत एस्.टी.तील पैलवान मंडळी त्या तरुणीकडे प्रेमाने पाहत असतात असे वर्णन येते. "ते दोघेही आपापली जाळी घारं म्हणजे पोतीच लावून टपून बसलेले होते." [१८] या शब्दांनी त्या पैलवानांच्या शरीराला व मनोवृत्तीला साजेसे असे वर्णन आहे असे वाटते.

या शब्दनिष्ठ विनोदाबरोबरच येथे प्रसंगनिष्ठ विनोदही येतो. 'पाळत' कथेत कथेच्या शेवटी पुढील वाक्ये येतात.

"'तात्या,'

'भिकाला बघताच तात्या चिडला, पण वरवर शांत होऊन त्यानं विचारलं.'

'आर तू झोपला होतास न्हवं ?'

'छ्या छ्या! कुठला झोपतुया. नुसत घोरण्याचं सोंग केलं.
जा घरी, मी आलोच.'

'पण तू हितं काय करतुयाय सांग की!'

चिझू तात्या म्हणाला, 'मी श्यानं खातुया तुला पाहिजे?'

'आता नगं. पुन्ना लागलं तर हितचं येईन मी बी.'"[१९]

वरील वाक्यातून लक्षात येते की, चिझू का होईना तात्या खरे बोललेला आहे. शेण खाणे म्हणजे - अनीतीने वागणे हा अर्थ लक्षात घेतला तर त्यातील प्रसंगनिष्ठ विनोद लक्षात येतो. हा प्रसंगनिष्ठ विनोद, 'एका दाताची कहाणी' मध्ये वेगळेच रूप धारण करतो. टिल्याचा दात काढण्याचा डॉक्टर सगळी शक्ती एकवटून प्रयत्न करतात. "पण छे! दात जागा सोडायला तयार नाही. डॉक्टरांच्या कपाळी साचलेला घाम टिल्याच्या वासलेल्या तोंडात थेंबाथेंबाने गळू लागला. ते चिकट, घवदार द्रावण मुखात पडताच एकदा त्याने काट्याचिमट्यासह भापकन तोंड मिटले आणि नकळत डॉक्टरांचे मनगट चावले गेले."[२०] टिल्याचे नशीबच एवढे वाईट की, डॉक्टरांनी या प्रकारे त्याचा चांगलाच दात हलवण्याचा प्रयत्न केला आणि त्याने डॉक्टरांचे मनगट चावले. खरे तर दाताची वेदना कमी करण्यासाठी तो डॉक्टरांकडे गेला आणि त्याच्या पदरी उलट अधिकच वेदना आली.

'करामत' या कथेत प्रसंगनिष्ठ विनोदाचे एक नमुनेदार उदाहरण येते. दामू डोक्यावरून पदर घेतलेल्या बाईला किष्णा समजतो व तिला छबडी, काकडी म्हणतो. मग म्हातारी त्याचे मनगट घट्ट पकडून त्याला अंधारात चपलेने मारते त्यावेळी ती त्याला शिव्याही देते. दामूनं ओळखलं हा म्हातारीचा आवाज होता. किष्णाबाई यायच्या ऐवजी

तिची सासू आली होती. शरमेने व माराने दामू अधमेला होऊन तिच्या हातातून आपला हात सोडवून घेवू लागला तशी म्हातारी चपलेने पायावर मारत म्हणाली," माझी छबडी ग, माझी काकडी काय ? तुला आला पटकीचा फेरा ! भाडव्या लोकांच्या बायका म्हणजे काय गावचं गायरान समजलास ? तुला क्याक्या खावसं वाटतं व्हय भाड्या, ये. खा मला ! खा रं सुकाळीच्या !"[२१] हा सगळा प्रसंगच असा विनोदी पध्दतीने उभा केला आहे की दामूच्या मनातील प्रेमाच्या गुलाबी चित्राचे व्यंगचित्रातच रूपांतर होते. तर 'वसुली' या कथेत गणपा पाटील आणि सदा ठकास महाठक भेटलेले आहेत. सदाचा मुलगा दाम्या गणपाच्या वस्तीवर आला आणि त्यानंतर तीनचार दिवसातच त्याची दोन्ही मुले आली. गणपा व त्याच्या बायकोने चौकशी केली. तेव्हा थोरलं पोरगं पुटपुटलं,

" या किश्यान् तुझ्या गेल्यापास्नं दोसरा काढलाय, सारखा बापू बापू म्हणून रडतुया. राती झोपतबी नाय.

आरं तिच्या मायली ! आसं घडलं व्हयं असं सदान हसत म्हटलं आणि गणपाकडे वळून म्हणाला, बरं का पाटील, त्येची काय गंमत हाय. गणपाच्या तोंडात शेण गेल्यासारखा त्याचा चेहरा झाला होता. बायकोचा चेहराही खेटर मारल्यासारखा झाला होता. सदा सांगू लागला, बरं का पाटील, या धाकट्याला हाय माझी सवय. एक खिनंभार मला इस्मून -हात नाय. जेवाय-खान्यापासून राती निजायचं झालं तरीबी मी त्येला लागतू. माझ्याबिगर ते झोपत दिखील नाय. आणि त्याचा ममतेने गालगुच्चा घेऊन त्यानं त्याचं गळणारं नाक धोतराच्या टोकानं पुसून टाकलं."[२२]

या प्रसंगातून सदाचा ग्रामीण शहाणपणा जसा दिसतो तसा गणपा व त्याच्या बायकोचा राग गिळून प्रसंग हसून साजरा करण्याशिवाय गत्यंतर नाही हा भावही स्पष्ट होतो. 'तर मी भाषणाला जातो' मध्ये नायकाच्या वाकीतील भाषणाचे असे वर्णन येते. वत्सलाबाईच्या मुलीस पाठवताना सभा झाली, तेव्हा मी साश्रू व हुंदक्यांसह भाषण केले. व ते सर्वांना कमालीचे आवडले. मोठ्या माणसाने साश्रू व हुंदक्यासह भाषण करणे ही गोष्ट विरळा आहे आणि ती प्रसंगनिष्ठ विनोद साकार करते. या कथांतील शब्दनिष्ठ विनोद काय अथवा प्रसंगनिष्ठ विनोद काय त्या त्या पात्रांच्या जीवनातील विसंगती, दिखावूपणाची हौस याच गोष्टी प्रकट करतो.

विनोदानंतर जीवनदर्शनाचा विचार करावयाचा. या कथांतील बहुसंख्य कथा या ग्रामजीवनातील आहेत. तर काही कथा नागर जीवनातील आहेत. ग्राम संग्रह जीवनातील तडजोड, अनैतिक संबंधांच्या गावगप्पा याचे दर्शन पाळत मध्ये होते. 'तर बाबा गोष्ट सांगा' मध्ये मध्यमवर्गीयांचे नाडलेले जीवन, नव्या संस्कृतीमुळे वाढलेले ताणतणाव, असहाय्यता या गोष्टी जाणवतात. तर हट्ट मध्ये एखाद्या मरणाच्या निमित्ताने ग्रामजीवनातील व्यवहार कसे आकार घेतात, गुणांचे कसे संकीर्तन होते हे लक्षात येते. 'तर एका दाताची कहाणी' मध्ये कौतुक स्वीकारावयास आलेल्या जावयाची कशी दुर्दशा होते त्याला वेदना सोसाव्या लागत असताना बाकीचे लोक कसा आनंद करतात हेही लक्षात येते. 'रजा' मध्ये राजाराम आपल्या पत्नीची भेट घेण्यास किती उत्कट होतो हे जसे लक्षात येते तसेच सभोवतालचा समाज कशी संवेदना हरवून बसला आहे हे जाणवते. प्रतिकूल परिस्थिती माणसाला शहाणपण शिकविते. 'करामत' मधील

विधवा किष्णाचे वागणे काय अथवा 'अग अग म्हशी' मधील नारायणाची चाल काय या गोष्टी हेच स्पष्ट करतात. तर 'वसुली'मधील सुताराने दाखवलेला हिसका गणपा पाटलाला चांगलाच धडा शिकवितो. तर 'सोबत' मध्ये एक कफल्लक माणूस प्राध्यापकासारख्या उच्चभ्रू माणसाच्या सहवासाचा लाभ अगदी सहजपणे उठवतो.

थोडे असे की शहर सर्वत्र मोठेपणाच्या हौसेचे दर्शन घडते. 'मी भाषणाला जातो' मध्ये भाषणाची हौस असणाराची फजिती होते तर 'लाल त्रिकोण' मध्ये समाज सुधारक बनणाराचे स्वप्न भंग पावते. तर 'सोबत'मध्ये शहरी शिष्टपणा करणाऱ्या तरुणीला चांगलीच अद्दल घडते. थोडक्यात या कथांतून जीवनात दोषापूर्ण बनलेल्या वृत्तीचीच खिल्ली उडविण्यात आली आहे.

आशयाच्या घटकांचा विचार केल्यानंतर अभिव्यक्तीचा विचार करणे इष्ट आहे. या कथांची शीर्षके अन्वर्थक आहेत. 'पाळत'मध्ये भिकयाच्या वडीलांवर मास्तरांची म्हणजेच समाजाची पाळत असते. तर पुढे वडिलांवर मुलाला पाळत ठेवावी लागते. आणि 'बाबा गोष्ट सांगा' या कथेत बाबा, बंड्या व बबडी ही तिघेजण एकच गोष्ट सांगण्याचा प्रयत्न करतात. बाबापेक्षा या दोन्ही मुलांचाच आवाज अधिक प्रभावीपणे ऐकू येतो तर 'एका दाताची कहाणी' या शीर्षकातून टिल्याची कैफियतच समोर येते ही कहाणी दातापेक्षा टिल्याच्या सासरी झालेल्या फजितीचीच कहाणी ठरते. 'रजा'मध्ये राजारामच्या सुखालाच रजा मिळते. तीन दिवसात पत्नीच्या सहवासाचे काही थोडे क्षण त्याला मिळतात. त्यावरही गावकरी, सासरा, मेहुणा यांच्या चाहुलीचा ताणच असतो. सभोवतालची परिस्थिती व मानवी स्वभाव यातून हे घडते.

'करामत' मध्ये किष्णा दामूला नेमकी पेचात पकडते तर 'अग अग म्हशी' मध्ये नारायण आपणाला लग्न करायचे नाही असे म्हणत म्हणत लग्नाला तयार होतो. पण तेही आडवळणाने. हे शीर्षक वाचल्यावर 'अग अग म्हशी मला कोठे नेशी' या वाक्प्रचाराची आठवण येते. त्या पाठीमागे एक कथा आहे. एकदा एक माणूस बायकोशी भांडला व घर सोडून जातो म्हणाला. बायकोने त्याला परवानगी दिली. तो नदीवर गेल्यावर त्याला घरी परत जावेसे वाटले. कसे जावे हा त्याच्या-पुढे प्रश्न होता तेवढ्यात त्याने पाहिले की आपल्या घरची म्हैस पाणी पिऊन घरी निघाली होती. तिची शेपटी पकडून तो माणूस वरील म्हण म्हणत घरी गेला. तसेच येथे झाले आहे. नारायणाला लग्नही करायचेय पण सुरुवातीला नकार देवून तो युक्तीने आपला कार्यभाग साधतो तर सोबत कथेत आलेपाक विकणारा एक सामान्य विक्रेता प्राध्यापकाचा सहवास सहजपणे मिळवितो.

ही शीर्षके कथेचे मर्म चांगल्या पध्दतीने स्पष्ट करतात. 'मी भाषणाला जातो' या कथेत समाजातील भाषण देणारांची हौस, त्यांची धडपड कोणत्याही संकटाशी मुकाबला करण्याचे प्रयत्न हे सगळे या शीर्षकातून स्पष्ट होतात तर 'लाल त्रिकोण' या कथेत सरकार, योजना व लाभधारक या त्रिकोणातून निर्माण होणाऱ्या हास्याची कारंजी पाहयला मिळतात. सोबत कथेत एस्.टी.प्रवासात अपेक्षिलेली रोमँटिक सोबत खूपच वास्तववादी आणि खोळकर ठरते हे लक्षात येते. ही शीर्षके कथावाचनाची उत्सुकता खचितच वाढवतात असे म्हणावेसे वाटते.

शीर्षकानंतर संवाद या घटकाचा विचार करावयाचा. हे संवाद

विविध वैशिष्टये व्यक्त करणारे संवाद आहेत. 'पाळत' या कथेत पुढील संवाद येतो. "मास्तर त्याच्या आणखी कानाजवळ गेले. पाठीवर हात ठेवला आणि म्हणाले, तशी ती बिनलग्नाची आईच. तात्याचं आनं तिचं लफडं हाय. साऱ्या गावाला ठाऊक हाय आन् तुला ठाऊक न्हाय !

देवाच्यानं ठाऊक न्हाय. भिकश्यानं गळ्याला हात लावला. आज तू बघातच राहा. दिवसभर तात्या तिच्या घरात पडलेला असतो. तुला चुकवून तो तिच्याकडंच जावून बसतो. सारं गाव तर म्हणतं की, तिला बाई म्हणून ठेवलीया तुझ्या तात्यानं !

अस्सं ! आज बघ तूच मग.

बघाच तात्याची पाळत सोडू नको, मास्तराने भिकश्याला कानमंत्र दिला आणि आपल्या घराकडे जाण्यासाठी ते बोळाकडे वळले." [२३] हा संवाद कथानकाला गती देणारा आहे. आपल्या तात्याच्या वर्तनावर पाळत ठेवली पाहिजे असे भिकश्याला वाटते आणि यातूनच पुढे कथानक गती घेते. कधी हे कथानक एखाद्या पात्राच्या अपेक्षा व दुसऱ्या पात्राने त्या अपेक्षापूर्तीची स्वप्ने दाखविणे यातूनही गती घेताना दिसते.

"व्हय पर किष्णा, आम्ही असंच झुरत राहायचं का ? का म्हणून ? आचं आता तरी मला कळलं की तुमचा जीव माझ्यावर हाय म्हणून. मलाबी रंडकीला कुणाचा तरी आधार पाहिजेच की, आणि तुमच्यापरीस कोण एवढा ऐपतदार लागून गेलाय या पांढरीत." [२४] हा संवाद एखादे पात्र खुबीने कसे बोलते व दुसऱ्या पात्राला झुलवत कसे ठेवते याचे नमुनेदार उदाहरण आहे. कधी हे संवाद कढाक्याचे संवादही

ठरतात, 'बाबा गोष्ट सांगा' या कथेत बाबांना आपली आई व रेगेबाई यांच्यापैकी जास्त कोण आवडतं असा प्रश्न बबडीने विचारल्यावर नायकाला नीट उत्तर देता येईना. पण हा प्रश्न बबडीच्या आईने ऐकलेला होता. त्यापुढचा संवाद असा आहे.

"'आल्या आल्या (ती) पायाशी बसली आणि ओणवी होऊन ओरडली, रामायण सांगता सांगता पोरांना हे रामायण सांगू लागलात वाटतं कमाल गं बाई या माणसाची ! काय वाट्टेल ते सांगाय पोरांना.. । अग पण प्रथम माझं ऐकू तर घे. मी कसा सांगेन बरं असलं ?' मी कळवळ्याने म्हटले.

'मग या पोरांनी प्रश्न कसा विचारला ? काही तरी नक्कीच सांगितलं असलं पाहिजे.'

'तुझ्या शप्पथ मी काही बोललो नाय.'

'हं घ्या. माझी शपथ. मी मेले तर तुम्हांला हवीच आहे नाहीतरी मी थोडीच आवडते तुम्हाला ? ती रेगेबाई आहे ना आवडीची. चिपाडासारखी दिसणारी. मुठीएवढा अंबाडा घालणारी आन् डोळ्यांना चापण लावणारी तीच तुम्हाला आवडायची. ती हुंदके देवू लागली.." २५ हा संवाद बंड्या व बबडी यांच्या साक्षीने होतो. हा संवाद जरी कडाक्याचा असला तरी बंड्याचे बाबा हे आक्रमक नाहीत. शरणशील आहेत.

कधी कधी हे संवाद एखादे व्यक्तिचित्र अगदी सहजपणे उभे करतात. 'वसुली' या कथेत सदाची बायको रखू आकांडतांडव करते. पाटलीणबाईला चवताळून बोलते. नंतर हा संवाद येतो.-- सदानं शेवटी तिला शांत केलं आणि अगदी नरमाईनं विचारलं अग तुला आल्या आल्या

रडाया काय झालं ?'

'बरचं हाय की- मग तुमी गेल्यापास्नं एक दिवस सुदीक करमलं नाय, रातभार झोप न्हाय. त्यात सगळी पोरबी हिकडचं ठेवून घेतली. एकट्यानं कसं राहावं ?' तिने लाडे लाडे सदाला सांगितले. सदाला धीर आला. हजामत व्हायची तीही वाचली. तो मंद हसू लागला. तशी त्याला बिलगत ती म्हणाली,'मी बी हिथचं तुमच्या संग राहते. मी नाय गावात जाणार.'" २६ सदाची बायको व सदा हे केवढे व्यवहारी आहेत किती निर्ढावलेले आहेत हे आपणाला या संवादातून लक्षात येते. काही संवादातून नाट्यमयताही व्यक्त होते. 'मी भाषणाला जातो' या कथेत आरडगावला सायकलवर जायचा नायकाचा विचार पक्का होतो. एका गावकऱ्याशी बोलताना पुढील संवाद येतो." 'पण सायकल कोण देणार मला ?' मी माझी अडचण सांगितली, 'त्याला काय अडचण हाय, मी देतो,' 'पण..... पण ......' मी आश्चर्यचकित होवून बोलतो.

'अवो दुकानदाराला जे भाडं द्याल ते मला द्या-माझी सायकल न्या तुम्ही !' त्याने स्पष्टपणे सांगितले.

'पण.......... सायकल चांगली आहे ना ?'

मी शंका उपस्थित केली. 'सायकल ? काय इचारता राव ?'

'एकदम नंबरी ! इमानासारखी पळते, पण जरा बसून होती चार महिनं; त्यानं जरा जुनी दिसते.'

'एवढेच ना, चला, चालेल मला !' मी त्याच्याबरोबर त्याच्या घरी गेलो." २७

सायकल कोठून मिळणार या प्रश्नाला मिळालेले उत्तर व सायकलची स्थिती यातून ही नाट्यमयता स्पष्ट होते. थोडक्यात कथानकाला गती

देणारे, मनातला भाव व्यक्त करणारे, नाट्यमयता स्पष्ट करणारे असे हे संवाद आहेत.

या कथांतून प्रामुख्याने डोळ्यांपुढे येते ती ग्रामीण भाषाशैली, प्रत्ययकारी वर्णन करण्यात ही भाषाशैली यशस्वी झाल्याचे जाणवते.

या कथासंग्रहात ग्रामीण तसेच शहरी भाषेचाही अतिशय कलात्मक व प्रत्ययकारी वापर केलेला आहे. 'करामत' या कथेत दामू किष्णा-पुढे मोठ्या खुबीने आपला प्रेमभाव प्रकट करतो. ' किष्णा तू रोजगार-बिजगार सोड आता आणि करायचाच असंल तर माझ्यात नुस्तं नावाला येत जा. तुझ्यासारखीनं रोजगार करनं. हाडं झिजवत मरण्यासाठी तुझा जन्म न्हाई. खारं नाय. किष्णा, तुझा कारभारी असता तर तुला असं काम करू दिलं असतं का ?"[२८] ही भाषाशैली दामूच्या बेरक्या स्वभावाचेही दर्शन घडवते.

तर 'रजा' या कथेत राजाराम विचार करतो की, आपली आई व पत्नी कशी वाट बघत असतील. तेव्हा पुढील वर्णन येते.

"हातातली सिगारेट न ओढताच संपत आली तेव्हा तो भानावर आला. त्याने आजूबाजूला पाहिले. गाव आला होता. चार-दोन झाडं गावाला सावली देत होती. एका उतरणीच्या झाडाजवळ त्याने टांगा उभा केला."[२९] मोजक्या शब्दात राजारामचे गावात येणे परिणामकारकपणे साकार केले आहे. तर कधी क्रियापदाचे वेगळे रूप येते. आपल्याला पत्नीचा सहवास मिळणार या आशेने आनंदलेल्या राजारामचे वर्णन करताना राजाराम 'प्रसन्नला.'[३०] असे वर्णन येते. प्रसन्नला असे क्रियापद सहसा वापरत नाही-त पण येथे त्याचा योग्य उपयोग केला आहे.

यानंतर या कथांच्या निवेदनपध्दतीचा विचार करावयाचा. 'पाळत,' 'बाबा गोष्ट सांगा!', 'हट्ट', 'वसुली', 'लाल त्रिकोण' व 'एका दाताची कहाणी' या कथांची तृतीय पुरुषी निवेदनपध्दती आहे. 'पाळत' कथेतील ही निवेदन पध्दती तात्या, भिक्या, मास्तर, शिरपा व तारा कासारीण यांचे स्वभावविशेष स्पष्ट करण्यास सहाय्यभूत ठरते. 'बाबा गोष्ट सांगा' या कथेतील तृतीय पुरुषी निवेदनपध्दती, मुले व पत्नी यांच्या दृष्टीने बाबाचे अगतिकपण प्रभावीपणे आविष्कृत करते. 'हट्ट' कथेतील सदासारख्या लहान मुलाचे भावविश्व वडलांच्या मृत्यूमुळे कसे कोंडीत सापडते हे या निवेदनाच्या पध्दतीमुळे अधिक स्पष्ट होते. तर 'वसुली' कथेतील ग्रामजीवनाचे तिढे या निवेदनपध्दतीमुळे उलगडण्यास मदत होते. 'लाल त्रिकोण' मधून शहरी मध्यमवर्गियांच्या तथाकथित समाजसेवेची फजिती या निवेदन पध्दतीमुळे वाचकांच्या प्रत्ययास अगदी सहजपणे येते. तर 'एका दाताची कहाणी'तील टिल्याची फटफजिती त्याच्या सासरच्या माणसाला एकाच वेळी केवढा मनस्ताप व करमणूक बहाल करते ते लक्षात येते.

'करामत,' 'सोबत,' 'अग अग म्हशी', 'रजा', 'मी भाषणाला जातो' व सोबत या कथांची प्रथमपुरुषी निवेदनपध्दती आहे. 'करामत' कथेतील किष्णा दामूला कसा इंगा दाखवते ते या निवेदन पध्दतीने अधिक स्पष्ट होते. तर 'सोबत' कथेतील प्रवाशाच्या वर्तनाची व त्या पाठीमागच्या मानसिकतेची निरीक्षणे या निवेदन पध्दतीमुळे परिणामकारकपणे आविष्कृत झालेली आहेत. तर 'अग अग म्हशी' मधील नारायणाने आपला हेतू कसा साध्य करुन घेतला हे या निवेदन पध्दतीने सहजपणे स्पष्ट केले आहे. 'रजा' मधील राजारामाचे मनीचे दुःख या निवेदन -

पध्दतीने नेमकेपणाने टिपले आहे. तर 'मी भाषणाला जातो' मधील नायकाची भाषणाची हौस योग्यरीत्या चित्रित झालेली आहे. तर 'सोबत' मधील तरुणीची आढयता व परिस्थितीने तिच्यात झालेला बदल या प्रथमपुरुषी निवेदन पध्दतीमुळे योग्य रीतीने आविष्कृत झाला आहे.

तर 'कधी गळ्यात बंधन नव्हतं'[३१] असे 'सोबत' या कथेत वर्णन येते. व नायिका अविवाहीत तरुणी आहे हे सूचकतेने सुचविले जाते.

ही भाषाशैली अलंकार वैभवाने नटलेली आहे. उपमा, अलंकार अनेक कथांतून येतो. 'बाबा गोष्ट सांगा' कथेत नायक स्वत:चेच वर्णन करतो. 'पोट वजनदार झाल्यामुळे मी पार उताणा राक्षस झोपावा तसा झोपलो होतो.'[३२] असे वर्णन येते. स्वत:ला दिलेली राक्षसाची उपमा ही रसिकांच्या चेहऱ्यावर हास्याची लहर उमटवणारी अशी आहे. तर 'पाळत' या कथेत तात्याचे वर्णन पुढीलप्रमाणे येते. "भिकंथा अगदी गाढ झोपी गेल्याचे त्यांना दिसले. त्यांनी सुटकेचा नि:श्वास टाकला. सकाळपासून कार्टयानं तंगवलं. मर म्हणावं आता.' असं पुटपुटत त्यांनी चपला उचलल्या. दोन चार पावलं पुढ गेल्यावर त्या आवाज न करता हळूच घासल्या. आणि बंदुकीची गोळी सुटावी तसा तो कासारणीच्या घरी गेला."[३३] तात्याच्या अधीरपणे जाण्याला बंदुकीच्या सुटलेल्या गोळीची येथे उपमा दिलेली आहे. त्यावरुन तात्याला झालेला त्रास, त्याच्या जीवाची तगमग हा सगळा भाव येथे प्रकट झालेला आहे. हा उपमा अलंकार अनेक ठिकाणी विविध कथात आलेला आहे.

डॉटचे देखील कलात्मक उपयोजन येते. 'सोबत' या कथेत पुढील वाक्ये येतात. "आपणाला उगीचंच वाटतं की ती थोड्या वेळानं बोलणार. आपण बोलणार, मैत्री होईल - ती दृढ होईल आणि मग.....होईल."[३४]

हा डॉट नायकाच्या मनातील अपेक्षा शब्दांवाचून पूर्ण करतो. नायकाचे प्रेम जमेल हा भाव त्या रिकाम्या शब्दांतून व्यक्त होतो. डॉटप्रमाणे डॅशचेही कलात्मक उपयोजन येते. 'रजा' कथेत आईच्या मिठीत असलेला राजाराम सामान डोक्यावर घेतलेला टांगेवाला झुलत आहे हे पाहतो व आईला म्हणतो, 'आये पयलं सामान तेव घरात त्यो बघ....'[३५] हा डॅश ओझ्याने वाकलेल्या टांगेवाल्याची तारांबळ स्पष्ट करतो. हे डॉट-डॅशचे उपयोजन या कथांतून मार्मिकपणे व कलात्मकतेने आलेले आहे.

या उपयोजनाप्रमाणे काही सामाजिक व सांस्कृतिक संदर्भही या कथांतून आलेले आहेत. 'पाळत' कथेत (पृ.९) वर आलेला शनीचा संदर्भ. 'बाबा गोष्ट सांगा' कथेत (पृ.३४) वर आलेला दत्ताचा व (पृ.३५)वरचा बजरंगबलीचा संदर्भ. 'अग अग म्हशी' कथेतला (पृ.६०) वरील बृहस्पतीचा संदर्भ तर 'सोबत' कथेतील (पृ.११४) वरील फडक्यांच्या कादंबरीतील नायिकेचा संदर्भ असे काही संदर्भ या कथेत आले आहेत. भिकयाने तात्याची केलेली दमवणूक पाहता त्यांनी त्याला शनी म्हणणे योग्य वाटते. तर वडिलांनी खोटे बोलू नये म्हणून त्यांना दत्ताची शपथ घालणारी बबडी आहे. याच कथेतील बंड्या गुरुजींना बजरंगबली म्हणतो. गुरुजींचे पैलवानी शरीर पण त्यांच्या स्वभावातील बोटचेपे-पणा हाच या संदर्भाने स्पष्ट होतो. तर खेड्यामध्ये एखादा मुलगा अधिक शिकलेला असला की गावातले लोकांना तो बृहस्पतीच वाटतो. फडक्यांच्या कादंबरीतील नायिका ही सौंदर्याची पुतळी, आधुनिक केशभूषा व वेषभूषा केलेली, त्या संदर्भामुळे नायकाची रोमँटिक वृत्तीच अधोरेखित होते. हे सगळे संदर्भ त्या त्या कथांचा आशय अधिक समृद्ध करतात असे म्हणावेसे वाटते.

कथारचनेच्या दृष्टीने 'पाळत' कथेत भिकयाच्या शाळा सुटण्याच्या प्रसंगाने कथेचा प्रारंभ होतो आणि तात्यावरील पाळत पूर्ण करण्याने कथा संपते. तर 'बाबा गोष्ट सांगा'मध्ये भोजनोत्तर विश्रांतीच्या नायकाच्या मूडने कथा सुरु होते आणि मुलांच्या झोपेतील बडबडण्याने कथा संपते. 'हट्ट'चा प्रारंभ पहाटेच्या वेळी सदाच्या घरातून अचानक सुरु झालेल्या रडण्याने सुरू होतो तर आपणाला भूक लागली आहे या सदाच्या रडण्याच्या सुराने कथा संपते. 'एका दाताची कहाणी' ही कथा टिल्याच्या सासुरवाडीला जाण्याने सुरू होते व त्याचा घारा हलणारा दात पडण्यास डॉक्टरापेक्षा सासुरवाडीचा लाडू कारणीभूत ठरतो. याने कथा संपते. 'रजा' कथेत एस्.टी.च्या बसस्थानकावरील थांबण्याने आणि राजारामच्या सुखाच्या चाहुलीच्या झुळकेने कथा सुरू होते आणि हिरमुसला होऊन पापण्यात दाटलेले पाणी नकळतपणे पुसत परत कामावर रुजू होण्यास निघालेल्या राजारामच्या प्रवासाने कथा संपते. या कथारचनेचे प्रारंभ व शेवट कौटुंबिक भावबंध हे आशयसूत्र नेमकेपणाने तोलून धरतात.

'करामत' कथेचा प्रारंभ दिवसाच्या समाप्तीने होतो तर शेवटही रात्रीच्या अंधारात किसनाच्या सासूने दामूची जी भेदरलेली अवस्था केली तिने होतो. 'अग अग म्हशी' या कथेचा प्रारंभ नारायणाच्या गावात येण्याने होतो आणि शेवट शकूला होकाराचे पत्र लिहिण्याने होतो. 'वसुली' कथेचा प्रारंभ न्हाव्याच्या कट्टयावर गणपा पाटील व सदा सुतार यांची गाठ पडण्याने होतो. तर शेवट गणपा पाटील पराभव कबूल करुन गाव सोडून जाण्यास सांगत असताना सदा आपण येथेच राहणार असे जोरदारपणे सांगतो; त्याने होतो. तर 'सोबत' कथेत एस्.टी.सुरू

होण्याने कथेचा प्रारंभ होतो आणि मोठेपणाचा भाव आणणा-या, आलेपाक विकणा-या गृहस्थाच्या प्रांजळपणाने कथा संपते. हे कथेचे प्रारंभ व शेवट अशा प्रसंगातून गुंफले आहेत; की त्या व्दारा शहाणपणाच्या दर्शनाने वेगवेगळे प्रकारच वाचकांसमोर स्पष्ट होतात. समाजात भाषण करणाराला विव्दान मानले जाते या नायकाच्या विषादपूर्ण उद्गाराने 'मी भाषणाला जातो' या कथेची सुरुवात होते; तर आरडगावच्या भाषणास जाताना नायक सायकलवरून पडतो याने कथा संपते. तर 'लाल त्रिकोण' या कथेची सुरुवात आपल्या देशातिषयीच्या एका तिरकस अभिप्रायाने होते तर शेवट निवेदक व त्यांच्या मित्रमंडळीने एका छोड्यातून पळण्याने होतो. 'सोबत' कथेचा प्रारंभ एस्.टी. सुरु होण्याने होतो तर शेवट नायकाच्या खांद्यावर तरुणीने झोपी जाण्याने होतो. हे सगळे प्रारंभ व शेवट मोठेपणाच्या डामडौलात वावरणा-या अशा आहेत.

या कथा संग्रहात काही दोषही आहेत. 'हट्ट' कथेचे शीर्षक योग्य वाटत नाही. सदाला भूक लागली आहे म्हणून तो रडतो आहे यातून हट्टाची कोणतीच छटा व्यक्त होत नाही तसेच याच कथेत(पृ.५५) वर पुढील परिच्छेद येतो. " पाटलाने आणि इतरांनी लाकडे रचली. गोव-या घातल्या आणि रॉकेल घालून अग्नी दिला. सदाला पाणी पाजायला लावले आणि जळत्या प्रेताकडे बघत सारेजण थांबले.प्रेताचं डोकं फुटेपर्यंत थांबून कोणीही हलायचे नसते." [३६] या वर्णनात एक दोष जाणवतो तो म्हणजे प्रेताला अग्नी दिल्यावर सदाने पाणी पाजले हे वर्णन चुकीचे वाटते.कारण अगोदर पाणी पाजले जाते व नंतर अग्नी दिला जातो आणि तेच योग्य आहे.कारण अग्नी दिल्यावर प्रेताला

पाणी पाजण्यासाठी जो जाईल तो भाजण्याची शक्यता आहे.

'सोबत' कथेत सहप्रवासी सुंदर तरुणी असावी असे नायकाला वाटते. त्यानंतरचे वर्णन असे येते - " आठ तासांचा खडतर प्रवास अखाद्या क्षणासारखा होईल आणि त्याच अपेक्षेने मी डोळे फाडफाडून माझी जागा शोधीत होतो. नंबर पाच पाहिली. ती पाहता पाहताच खाट्याळ नजर नंबर सहाकडे वळली. तो माझा माझ्यावर विश्वासच बसेना. कल्पने-पेक्षाही सुंदर युवती बसली होती." या वर्णनात पाच व सहा एस्.टी.च्या सीटस् शेजारी शेजारी नसतात. सहा व सात क्रमांकाच्या सिटस् शेजारी असतात. हा वर्णनातला अचुकतेचा अभाव हा दोष आहे.

तसेच कथेत नायक व त्याच्या शेजारच्या सीटस्वरील सहप्रवासी तरुणी यांचे भांडण होते. या नायकाचा पेपर त्या तरुणीने घेतलेला असतो असे त्याला वाटते. "त्यावर ती चवताळून उत्तर देते. त्यावेळी पिलावर झडप घालणाऱ्यावर तुटून पडणाऱ्या वाघिणीप्रमाणे चवताळून ती म्हणाली, तुम्हांला कुणी सांगितलं मी घेतला म्हणून. फुकटचे पेपर मी वाचीत नसते." ३७ या ठिकाणची उपमा योग्य वाटत नाही. असे काही दोष या कथासंग्रहात जाणवतात. शीर्षकाची यथार्थता नसणे, वर्णनात अचूकता नसणे. उपमेचे अर्थपूर्ण उपयोजन नसणे हे दोष या कथासंग्रहात आहेत.

असे असले तरी या कथासंग्रहातून नीती-अनीती, सुखदु:ख, संवेदनेची तरलता व बधिरता, तत्त्वव्यवहार इ.संमिश्र जीवनाचे दर्शन घडते त्यातून लेखकाचा आशावादी, उदार मतवादी मिस्किल पण नीतीवादी दृष्टीकोण स्पष्ट होतो. 'पाकिट', 'करामत' या कथांतून नीती अनीतीचा विचार अप्रत्यक्षपणे अधोरेखित झाला आहे. 'बाबा गोष्ट सांगा' या

कथेतही अप्रत्यक्षपणे नीती अनीतीची भलावण केली आहे. 'रजा' कथेत संवेदना हरवलेला समाज येतो. 'वसुली' मध्ये व्यवहारी शहाणपणाची सापेक्षता जाणवते. 'मी भाषणाला जातो' व 'लाल त्रिकोण' या कथांतून मोठेपणाच्या हौसेची फजिती जशी जाणवते तशाच शहरी उच्चभ्रूंच्या मर्यादाही जाणवतात.

या कथांचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे येथील व्यक्तिगत भावानुभवाला समाजजीवनाचा संदर्भ आहे. अनेक कथांतील पात्रांच्या चित्रणातून समूहमनाचा गजरच ऐकू येतो.

गुरुजी, शिल्पा, तारा (पाळत), सासूबाई, रेगेबाई (बाबा गोष्ट सांगा), पाटील, नर्मदा, मुरग्या, दगडू भोसले, सासरची माणसे व गावातील माणसे (हट्ट), डॉक्टर, मेहुणे कंपनी (एका दाताची कहाणी), टांगेवाला, गावातील बायका, राजाराम किसना पवार, इतर मित्रमंडळी (रजा), केसू तात्या, म्हातारी (करामत), हरिबा, पुतळा मावशी (अग अग म्हशी), बाबू न्हावी, गणपा पाटील, सदाचे कुटुंबिय (वसुली), म्हातारी, सासरेबुवा (सोबत), नायकाची पत्नी, छोटूकाका, वत्सलाबाई, गणोबा पोटफोडे, रमाबाई, सायकल देणारा गावकरी, (मी भाषणाला जातो), पेन्शनरांचा क्लब, गृह उद्योगातील विधवा, खेड्यातील गावकरी, शाळेतील मुले, शिक्षक ('लाल त्रिकोण'), ही सगळी पात्रे त्या त्या कथेत काही काळच येतात पण कथेचा आशय अधिक संपन्न करतात.

ग्रामीण साहित्यातून समूह मनाचा गजर ऐकू येतो असे जे म्हटले जाते ते आपणास ही पात्रे व त्यांच्या परस्परांच्या अंतर्क्रिया व मुख्य पात्रांशी होणाऱ्या अंतर्क्रिया यातून स्पष्ट होते. या कथासंग्रहाविषयी प्रा. पंडित टापरे म्हणतात -

" या कथांतून मानवी मनातील विविध वृत्ती-प्रवृत्तींचे दर्शन जसे घडते तसेच जीवनातील विसंगती, विरोध हेही ठळकपणे सामोरे येतात...... या कथात अनेक ठिकाणी मानवाच्या अपूर्णतेचे दर्शन घडविणारी व्यंगचित्रेच लेखकाने काढली आहेत असे म्हणावेसे वाटते. ही मर्यादा, ही अपूर्णता विनोदाच्या भरजरी लेण्याने विनटलेली आहे. येथे सांस्कृतिक, सामाजिक आणि कौटुंबिक जीवनातील विलक्षण ताण-तणाव विनोदामुळे सुसह्य झालेले आहेत. भारतीय मनास असलेले पाप-पुण्याचे भान, समाधानी वृत्तीने राहावे ही चांगलीच अंगवळणी पडलेली शिकवण यातून हे जीवन अगदी सहजपणे विनोदाच्या अंगाने फुलत जाते. हा विनोद खूप सादृश्य आहे. गतीमान, निवेदनामुळे त्यास टोकदारपणा लाभतो; पण रसिकांना हसवता हसवताच सदाच्या भाकरीसाठी रडणाऱ्या, पत्नीस भेटीविना परत जाणाऱ्या राजारामाच्या रडवेल्या चेहऱ्याने तो अंर्तमुखी करतो. ग्रामीण जीवनातील व्यामिश्र, उत्कट आणि विविध अनुभवाचे दर्शन या कथा अगदी सहजतेने आणि कलात्मकतेने घडवितात."[३८] हे मत आपणास पटते.

वरील सर्व विवेचनावरुन आपणास असे म्हणता येईल की, या कथासंग्रहाची कौटुंबिक भावबंधाचा आविष्कार, शहाणपणाचे दर्शन व मोठेपणाच्या हौसेचे चित्रण ही आशयसूत्रे आहेत. तसेच वेधक व्यक्ति-चित्रे, व्यक्तिचित्रांना पूरक ठरणारी समूहचित्रे, विविध नाती उलगडणारे मनोविश्लेषण, विनोदाचे कलात्मक उपयोजन, ग्राम जीवनाचे प्रत्ययकारी दर्शन, अन्वर्थक, रसिकांची उत्सुकता वाढवणारी शीर्षके, कथानकास गती देणारे, मनातला भाव, नाट्यमयता स्पष्ट करणारे संवाद, ग्रामीण तसेच शहरी भाषेची कल्पक योजना, निवेदन पध्दतीतील

निविधाता, उपमा अलंकार, डॅश-डॉट, सामाजिक सांस्कृतिक संदर्भ यांचे कल्पक आयोजन, आशयसूत्र, तोलून धरणारे कथेचे प्रारंभ व शेवट ही वैशिष्टये आहेत.

तर काही ठिकाणी शीर्षकाच्या यथार्थतेचा अभाव, वर्णनात अचूकपणा नसणे, अलंकाराच्या अर्थपूर्ण आयोजनाचा अभाव हे दोष आहेत.

असे असेले तरी संमिश्र जीवनाचे दर्शन, उदारमतवादी, मिस्कील पण नीतिवादी जीवनविषयक दृष्टिकोण, व्यक्तिगत भावानुभवाला समाज-जीवनाचा संदर्भ यामुळे या कथांची गुणवत्ता वाढली आहे. तिच्यातील वास्तववादाचे चित्रण अधिक प्रत्ययकारी झाले आहे.

=-=-=-=-=

## प्रकरण तिसरे - संदर्भ :-


१) द.ता.भोसले, पाळत, पुणे १९७७, पृ.९२

२) उनि.पृ.१०२

३) उनि.पृ.१३३

४) उनि.पृ.१०२

५) उनि.पृ.१०२

६) उनि.पृ.४

७) उनि.पृ.१०

८) उनि.पृ.४७

९) उनि.पृ.४७

१०) उनि.पृ.१३९

११) उनि पृ.२१

१२) उनि.पृ.२४

१३) उनि.पृ.१३२

१४) उनि.पृ.९

१५) उनि.पृ.१४३

१६) उनि.पृ.६९

१७) उनि.पृ.१०३

१८) उनि.पृ.११६

१९) उनि.पृ.११

२०) उनि.पृ.१४५

२१) उनि.पृ.२१

२२) उनि.पृ.८२

२३) उनि•पृ•४

२४) उनि•पृ•१६

२५) उनि•पृ•४७

२६) उनि•पृ•८६

२७) उनि•पृ•११०

२८) उनि•पृ•१७

२९) उनि•पृ•९०

३०) उनि•पृ•९९

३१) उनि•पृ•११५

३२) उनि•पृ•३३

३३) उनि•पृ•१०

३४) उनि•पृ•११६

३५) उनि•पृ•९०

३६) उनि•पृ•५५

३७) उनि•पृ•११९

३८) पंडित टापरे, नवभारत,वाई, सप्टेंबर ७८,पृ•५७•

=-=-=-=-=